घड्याळ म्हंटल की..
विठ्ठल वॉच
नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरूस्ती
सुधाकर कॉम्पलेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

छोटी जाहिरात मोठा प्रतिसाद
दैनिक प्रीतिसंगममध्ये छोट्या जाहिराती प्रसिद्धीसाठी देवून सहकार्य करा..
संपर्क
कराड-२२७७२५/७३५०६४२३९४
सातारा कार्यालय-९२२६३९८८१७

वर्ष २९ वे | अंक ३६८ | पाने ४ | मंगळवार | दि. ३१ मार्च २०२६ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५



कराड नगरपालिकेने पोलीस बंदोबस्तात शहरातील अतिक्रमणे हटवण्याची मोहिम राबवली. पहिल्या दिवशी मुख्य बाजारपेठेतील अतिक्रमणे काढण्यात आली पहिल्या छायाचित्रात पालिकेचे कर्मचारी जेसीबीच्या सहाय्याने खोके टॅक्टरमध्ये चढवताना तर दुसऱ्या आणि तिसऱ्या छायाचित्रातही ज्यांनी अतिक्रमणे काढली नाहीत त्यांचे साहित्य पालिकेने उचलून नेहून ताब्यात घेतली. छाया-अस्लम मुल्ला.

# कराडात पालिकेची धडक अतिक्रमण मोहिम

## पोलीस बंदोबस्तात कारवाई ; ३५ अतिक्रमणे हटवली:स्वयंस्फूर्तीने अतिक्रमणे हटवण्याचे आवाहन

**कराड/प्रतिनिधी:-**

शहरातील वाढत्या अतिक्रमणांवर नियंत्रण मिळवण्यासाठी कराड नगरपालिकेने सोमवारी व्यापक मोहीम राबवत कृष्णा नाका ते बसस्थानक या गजबजलेल्या पट्ट्यात धडक कारवाई केली. सकाळी दहा वाजता सुरू झालेली ही मोहीम सायंकाळी सहा वाजेपर्यंत अखंड सुरू होती. या आठ तासांच्या कारवाईत तब्बल ३५ अतिक्रमणांवर हातोडा टाकण्यात आला.

फुटपाथवर उभारलेले हातगाडे, पानपट्टचा, फळविक्रेते, चहाचे स्टॉल, तसेच रस्त्याकडेला उभारण्यात आलेली सिमेंट-काँक्रीटची कायमस्वरूपी बांधकामेही हटवण्यात आली. या कारवाईमुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलीस बंदोबस्तामुळे परिस्थिती नियंत्रणात राहिली.

या मोहिमेत नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी प्रफुल्ल वनखंडे, नगररचना अभियंता सचिन पवार, अभियंता पुष्कर पाटील, पाणीपुरवठा विभागाचे संदीप रणदीवे, स्वच्छता निरीक्षक सचिन काटकर यांच्यासह पालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पालिकेने अतिक्रमणांविरोधात घेतलेली ही कारवाई शहरातील वाहतूक सुलभ करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात असून, पुढील टप्प्यातही अशीच मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

### पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त

अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. पोलीस उपाधीक्षक राजश्री पाटील आणि पोलिस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक राजेश माळी यांच्यासह सज्जन जगताप, सिकंदर शेख, मारुती लाटणे, दादासो धडस, विठ्ठल गवळी, स्वप्ना साळुंखे आदींसह १२ पोलिस कर्मचाऱ्यांनी तब्बल नऊ तास सतर्कता राखली.

### टप्प्याटप्प्याने कारवाईचा आराखडा

नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांच्या देखरेखीखाली शहरातील अतिक्रमणांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात कृष्णा नाका, विजयदिवस चौक, बसस्थानक, दत्त चौक ते कोल्हापूर नाका या प्रमुख मार्गांवरील अतिक्रमणे हटवण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सोमवारी बसस्थानकापर्यंतचा टप्पा पूर्ण करण्यात आला असून, पुढील दिवसांत उर्वरित भागात मोहीम राबवली जाणार आहे.

> वाहतुकीला अडथळा ठरणारी अतिक्रमणे नागरिकांनी स्वतःहून हटवावीत. अन्यथा पालिकेकडून कठोर कारवाई केली जाईल. फुटपाथ, रस्ते आणि सार्वजनिक जागांवरील कोणत्याही अतिक्रमणाला यापुढे मुभा दिली जाणार नाही.
>
> **– प्रशांत व्हटकर**
> **(मुख्याधिकारी, कराड नगरपालिका)**

### डांगेनंतर व्हटकरांचा हातोडा

मुख्याधिकारी यशवंत डांगे यांच्या कार्यकाळात फेब्रुवारी २०२० मध्ये कराड शहराने सर्वात मोठी अतिक्रमण हटाव मोहीम अनुभवली होती. तब्बल दहा ते पंधरा दिवस सुरू असलेल्या या धडक कारवाईची राज्यभर चर्चा रंगली होती. त्यानंतर तब्बल सहा वर्षांनी मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांनी पुन्हा एकदा अतिक्रमणांवर कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. मोहिमेच्या पहिल्याच दिवशी ३५ अतिक्रमणे जमीनदोस्त करून प्रशासनाने आपला इरादा स्पष्ट केला असून, पुढील काही दिवसांत ही मोहीम अधिक व्यापक स्वरूप धारण करणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# एस.पी.तुषार दोशी सक्तीच्या रजेवर

## कार्यभार अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर यांच्याकडे


**सातारा/प्रतिनिधी:-**



सातारा जिल्हा परिषदेच्या अपहरण नाट्य मध्ये निलंबन प्रस्तावामुळे चर्चेच्या केंद्रस्थानी असलेले साताऱ्याचे पोलीस अधीक्षकतुषार दोषी हे सक्तीच्या रजेवर गेल्याने हे प्रकरण त्यांना भोवल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. प्रत्यक्षात दिनांक ६ एप्रिल पर्यंत पोलिस अधीक्षक दोषी यांनी अर्जित रजा टाकल्याची माहिति पोलीस सूत्रांच्या वतीने देण्यात आली आहे.

त्यामुळे सध्या सातारा जिल्हा पोलीस दलाचा कार्यभार अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर यांच्या हाती सोपवण्यात आला आहे. सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीमध्ये भाजपने पोलीस बळाचा वापर करून राष्ट्रवादीच्या जिल्हा परिषद सदस्यांना अटक करण्यास भाग पाडले .त्यामुळे भाजप सत्तेत येऊन राष्ट्रवादी व शिवसेनेचे संख्या बळ कमी पडले .या गोंधळ नाट्याचे थेट विधान परिषदेमध्ये पडसाद उमटून सातारा जिल्हा पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रचंड टीका झाली. या प्रकरणांमध्ये पोलीस अधीक्षक तुषार दोशीयांना निलंबित करण्याचे आदेश विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी दिले .मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळाची कार्यकारी समिती चौकशी करेल असे सांगून सातारा पोलीस अधीक्षकांचा बचाव केला.

पान ३ वर



# सातारा शहरासह जिल्ह्यात गारांचा पाऊस

**सातारा/प्रतिनिधी:-**

सातारा शहरासह परिसरात सोमवारी दुपारनंतर अचानक वातावरणात बदल होऊन सायंकाळच्या सुमारास गारांसह पावसाच्या सरी कोसळल्या. हलक्या ते मध्यम वाऱ्यासह झालेल्या या अवकाळी पावसामुळे नागरिकांची धावपळ उडाली. तसेच शहर व परिसरात बाजारपेठेत खरेदीसाठी आलेल्या नागरिकांसह व्यावसायिकांची तारांबळ उडाली.

सोमवारी सायंकाळी अचानक आलेल्या पावसामुळे काही ठिकाणी जनजीवन विस्कळित झाले. रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागला. काही काळासाठी शहरातील वाहतूकही विस्कळित झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. गारांच्या सरीमुळे उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला असला तरी या पावसाने दैनंदिन कामकाजावर परिणाम झाला.

दरम्यान, या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील शेती पिकांना फटका बसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. विशेषत: काढणीला आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे शेतकरी वर्गाकडून सांगितले जात आहे. तसेच जिल्ह्यातील वीटभट्टी व्यावसायिकांनाही सोमवारच्या पावसाचा मोठा फटका बसला असून तयार वीट भिजल्याने वीट व्यावसायिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी व व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मोर्वे (ता. खंडाळा) येथील सोलाडी शिवार नावाच्या परिसरात वीज कोसळून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेत शेतकरी अमोल गोपाळ धायगुडे यांच्या ८ शेळ्यांचा मृत्यू झाला असून १ मेंढी गंभीर जखमी झाली आहे. अचानक झालेल्या या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. संबंधित प्रशासनाकडून पंचनामा करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.



लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिखर शिंगणापूर येथील शंभू महादेव यात्रेसाठी अवघड मुंगी घाटातून जात असताना काट्या व कावड्यांचा थरार. छाया-दत्ता इनामदार

### तीर्थकर..

चोवीसावे तीर्थकर
श्रीमहावीर भगवान
साक्षात वैराग्य मूर्ती
सद् गुणांनी धनवान
बारा वर्षाचे मौनव्रत
खडतर सतत ध्यान
हटयोगे कष्टले शरीर
प्राप्त करे केवलज्ञान
अस्तेय ब्रह्मचर्य रूपे
जगताशी करे संधान
मानवआहोत जागृत
ठेवावे सदा अवधान
संयम करूणा शील
हेच समृध्द खानदान
हिंसा जागवी पशुत्व
किटका द्या जीवदान
दुखवू नका कुणाही
सद् वृत्तीचे अवधान
मीत सात्विक आहार
संध्यापूर्वचं जलपान
उपवासे शरीर शुध्दी
अन्नाचा नीतसन्मान
संचय संग्रह टाळावा
लोभ राक्षसा समान
णमोकार मंत्रोच्चार
संतप्त रे जीवनमान
जाण खरा जैन धर्म
निरागस हो आयुर्मान

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# तासवडे येथील केमिकल कंपनीत भीषण स्फोट

## रात्री साडे नऊच्या दरम्यान दुसरा स्फोट:नागरिकांत घबराहट

**उंब्रज/प्रतिनिधी:-**

कराड तालुक्यातील तासवडे एमआयडीसी औद्योगिक वसाहतीत सोमवारी सकाळी केमिकल कंपनीत भीषण आग लागून स्फोटांची मालिका घडल्याने संपूर्ण परिसर हादरून गेला. स्फोटांचे आवाज तब्बल पाच किलोमीटर अंतरावरून ऐकू येत होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी कंपनीचे कोट्यवधींचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 'एम्ब्रोजिल बेस' उत्पादनाशी संबंधित S.K.S. फाईन केम (प्लॉट क्र. इ-१/४७) या कंपनीत ही घटना घडली. कंपनीचे मालक सर्जेराव किसन साळुंखे (सध्या रा. उंब्रज, मूळ पाटण) असून व्यवस्थापक म्हणून सचिन व्यंकटराव मानकर कार्यरत आहेत.

घटनेच्या आधीच्या दिवशी केमिकल बॉयलर चार्जिंगची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. सोमवारी सकाळी कंपनी सुरू करताना बॉयलर पेटवण्यात आला. त्यानंतर अचानक आग लागली आणि उच्च तापमानामुळे परिसरातील केमिकल भरलेल्या बॅरल्सना एकामागून एक स्फोट होऊ लागले. स्फोटांची तीव्रता इतकी प्रचंड होती की संपूर्ण औद्योगिक परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच तळबीड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र भोरे, उंब्रजचे पंकज पवार यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तसेच तहसीलदार कल्पना ढवळे, प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे आणि डीवायएसपी राजश्री पाटील यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

दरम्यान, कराड नगरपालिका, सह्याद्री सहकारी साखर कारखाना, जयवंत शुगर तसेच अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्यांचे अग्निशमन बंब तात्काळ दाखल झाल्याने आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नांमुळे मोठा अनर्थ टळला.

या भीषण आगीत कंपनीतील यंत्रसामग्री, कच्चा माल व तयार माल पूर्णपणे जळून खाक झाला असून इमारतीचेही मोठे नुकसान झाले आहे. आगीची झळ शेजारील कंपन्यांनाही बसल्याचे सांगितले जात आहे.

प्राथमिक अंदाजानुसार, ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सुदैवाने वेळीच कामगार बाहेर पडल्याने मोठी जीवितहानी टळली.दरम्यान, या प्रकरणी तळबीड पोलीस ठाण्यात अकस्मात जळीत क्र. १ अशी नोंद करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र भोरे करीत आहेत. सुरक्षाव्यवस्थेत त्रुटी आढळल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

> या कंपनीत सकाळी स्फोट झाल्यानंतर आग विजवण्यात आली. सायंकाळी साडेनऊच्या दरम्यान पोलीस या ठिकाणी पंचनामा करण्यासाठी गेल्याचे समजते त्याच दरम्यान पुन्हा या कंपनीत दुसरा स्फोट झाला या स्फोटामुळे कंपनीच्या आसपास असलेल्या सर्व कामगारांचे डोळे जळजळत असल्याचे याठिकाणावरून सांगण्यात आले.



तासवडे एमआयडीसीतील S.K.S. फाईन केम कंपनीत स्फोट झाल्याने आग लागली. या आगीत कंपनी जळून खाक झाल्याचे दिसत आहे.

# संपादकीय

## ट्रम्पविरोधात उद्रेक

अमेरिकेसारख्या जगातील सर्वात जुनी आणि प्रभावशाली लोकशाहीत एखाद्या राष्ट्राध्यक्षाविरोधात कोट्यवधी लोक रस्त्यावर उतरतात, ही केवळ राजकीय घटना नसून ती लोकशाहीच्या आरशात दिसणारा एक गंभीर इशारा असतो. सध्या अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात उसळलेले नो किंग्स आंदोलन हे याच असंतोषाचे प्रतीक बनले आहे. देशातील सर्व ५० राज्यांमध्ये झालेल्या या आंदोलनात अंदाजे ८० लाखांहून अधिक लोकांनी सहभाग घेतल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेली ही निदर्शने अमेरिकेतील राजकीय वातावरण किती तापले आहे, याचे स्पष्ट चित्र दाखवतात, तसेच सत्तेविरोधात नागरिकांच्या संतापाचा उद्रेक झालेला पाहायला मिळाला.

या आंदोलनाला नो किंग्स रॅली असे नाव देण्यात आले आहे. नो किंग्स म्हणजे या देशात कोणीही राजा नाही, हा संदेश देण्याचा प्रयत्न आंदोलकांकडून करण्यात आला. अमेरिकेची लोकशाही ही संविधान, कायदे आणि जनतेच्या अधिकारांवर आधारित आहे; एखाद्या व्यक्तीला अमर्याद सत्ता देण्याच्या विरोधात हे आंदोलन उभे राहिले आहे. हे आंदोलन अचानक घडलेले नाही. जून २०२५ मध्ये याच नावाने झालेल्या पहिल्या आंदोलनात सुमारे ५० लाख लोक सहभागी झाले होते. ऑक्टोबर २०२५ मध्ये दुसऱ्या रॅलीत ७० लाख लोक रस्त्यावर उतरले होते. आता तिसऱ्या रॅलीत हा आकडा ८० लाखांवर गेल्याचे सांगितले जात आहे. म्हणजेच ट्रम्पविरोधात अमेरिकन जनतेचा संताप सातत्याने वाढत आहे.

अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डी. सी. येथे आंदोलनाचा सर्वात मोठा प्रभाव पाहायला मिळाला. आंदोलकांनी लिंकन मेमोरिअलसमोर गर्दी केली. देशाच्या स्वातंत्र्य आणि लोकशाहीचे प्रतीक असलेल्या या ठिकाणी जमलेली गर्दी ही केवळ निषेध नव्हती, तर ती लोकशाहीचे संरक्षण करण्याची घोषणा होती. त्याचबरोबर न्यू यॉर्क शहर मधील टाइम्स स्क्वेअर येथे हजारो लोकांनी मोर्चा काढला. लॉस एंजेलिस, मिनेसोटा, डॅलस, शिकागो यांसारख्या शहरांमध्येही मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली. इतकेच नव्हे, तर संयुक्त राष्ट्राबाहेर राहणाऱ्या अमेरिकन नागरिकांनीही पॅरिस आणि लंडन येथे आंदोलन केले. यावरून या असंतोषाची व्याप्ती किती मोठी आहे, हे स्पष्ट होते. या आंदोलनामागे अनेक कारणे आहेत. महत्वाचे कारण म्हणजे इराणसोबत वाढलेला तणाव आणि युद्धाचा धोका. ट्रम्प प्रशासनाने घेतलेल्या आक्रमक धोरणांमुळे अमेरिकेतील सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. युद्धामुळे महागाई वाढली आहे, डॉलर कमकुवत होत चालला आहे आणि पेट्रोल-गॅसपासून रोजच्या वस्तूंपर्यंत सर्व काही महाग झाले आहे. दुसरे कारण म्हणजे, स्थलांतरितांवर सुरू केलेली कठोर कारवाई होय. ट्रम्प प्रशासनाने इमिग्रेशनविरोधात घेतलेल्या कठोर निर्णयांमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. मिनेसोटामध्ये फेडरल इमिग्रेशन एजंट्सच्या कारवाईत दोन नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर संताप आणखी वाढला. तिसरे कारण म्हणजे अमेरिकेत वाढत चाललेली आर्थिक विषमता. आंदोलकांचे म्हणणे आहे की, ट्रम्प प्रशासन श्रीमंत उद्योगपती आणि अब्जाधीशांच्या बाजूने धोरणे आखत आहे. सामान्य नागरिक मात्र महागाई, बेरोजगारी आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबला जात आहे.

या आंदोलनात अनेक प्रसिद्ध व्यक्तींनी सहभाग घेतला. हॉलीवूडचे ज्येष्ठ अभिनेते रॉबर्ट द निरो यांनी न्यूयॉर्कमधील आंदोलनात सहभागी होऊन ट्रम्प यांच्या धोरणांवर तीव्र टीका केली. त्यांनी म्हटले की, देशाला एका धोकादायक दिशेने नेले जात आहे आणि लोकांनी शांततापूर्ण मार्गाने त्याला विरोध करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रसिद्ध गायक ब्रूस स्प्रिंगस्टीन यांनी मिनेसोटामधील आंदोलनात सहभागी होत आंदोलनात्मक गाणे सादर केले. अमेरिकेत कलाकार आणि बुद्धिजीवी वर्गाचा या आंदोलनात सक्रिय सहभाग दिसून आला. या आंदोलनावर प्रतिक्रिया देताना डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्व आरोप फेटाळले आहेत. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, मी कधीही स्वतःला राजा म्हटलेले नाही. माझे निर्णय देशाला मजबूत करण्यासाठी आहेत. त्यांच्या मते, या आंदोलनामागे विरोधी पक्ष आणि माध्यमांचा हात आहे. व्हाइट हाऊसच्या प्रवक्त्यांनी या आंदोलनाची खिल्ली उडवली. त्यांनी, ट्रम्पविरोधी मानसिकतेचा अतिरेक असे या आंदोलनाचे वर्णन केले आहे. अमेरिकेतील विश्लेषकांच्या मते, ट्रम्प प्रशासनाने घेतलेल्या काही निर्णयांमुळे लोकशाही व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कार्यकारी आदेशांचा मोठ्या प्रमाणावर वापर, राज्य सरकारांचा विरोध असतानाही नॅशनल गार्डची तैनाती आणि राजकीय विरोधकांवर कारवाई करण्याची भाषा या सर्व गोष्टींमुळे असंतोष वाढला आहे.

नो किंग्स आंदोलनाचा मुख्य संदेश हाच आहे. अमेरिकेच्या संविधानानुसार सत्ता ही जनतेची असते. राष्ट्राध्यक्ष हे केवळ जनतेने निवडलेले प्रतिनिधी असतात. परंतु जर एखादा नेता स्वतःला सर्वात वर समजू लागला, तर लोकशाही धोक्यात येते. आंदोलकांनी याच गोष्टीचा निषेध केला आहे. या आंदोलनाने अमेरिकेतील राजकीय ध्रुवीकरण किती तीव्र झाले आहे, हेही स्पष्ट केले. ट्रम्प समर्थक व ट्रम्प विरोधक आमनेसामने उभे राहिल्यामुळे अमेरिकेतील राजकारण टोकाला गेले आहे. सामान्य नागरिकांमध्येही याचा परिणाम दिसून येत आहे. सोशल मीडियावर तीव्र वाद, रस्त्यांवरील आंदोलने आणि राजकीय नेत्यांमधील आरोप-प्रत्यारोप या सर्व गोष्टींमुळे अमेरिकेतील सामाजिक वातावरण तणावपूर्ण झाले आहे. अमेरिकेत घडणाऱ्या या घटना भारतासारख्या लोकशाही देशांसाठीही महत्त्वाच्या आहेत. लोकशाही केवळ निवडणुका घेऊन टिकत नाही; ती टिकते ती जनतेच्या जागरूकतेवर. जर सरकार चुकीचे निर्णय घेत असेल, तर जनतेने शांततापूर्ण मार्गाने त्याला विरोध करणे आवश्यक असते. नो किंग्स आंदोलनाने हेच दाखवून दिले आहे. लाखो लोक रस्त्यावर उतरले, परंतु बहुतेक ठिकाणी आंदोलन शांततेत पार पडले. यावरून लोकशाहीची ताकद काय असते, हे दिसून येते.

# जिल्ह्यात कचरा व्यवस्थापनाची गरज

**सातारा जिल्हा शासकीय रुग्णालयातील अर्भक मृत्यू प्रकरणाने संपूर्ण जिल्हा तसेच राज्यात मोठी खळबळ उडवली आहे. एका अल्पवयीन मुलीच्या अकाली प्रसूतीनंतर ७५० ग्रॅम वजनाच्या अर्भकाचा मृत्यू झाल्याच्या घटनेने वैद्यकीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. या घटनेमुळे गरीब आणि सर्वसामान्य लोकांसाठी असलेल्या सरकारी आरोग्य व्यवस्थेची खरी स्थितीही उघड केली आहे. या घटनेनंतर उच्चस्तरीय समितीकडून जिल्हा शल्यचिकित्सकांसह संबंधित वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नॉनस्टॉप चौकशी करण्यात आली, ही बाबही या प्रकरणाची गंभीरता अधोरेखित करते.**



**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

वनविभाग, सातारा यांच्या वतीने कचरामुक्त कास पठार या सामाजिक उपक्रमांतर्गत जागतिक नैसर्गिक वारसा स्थळ कास पुष्प पठार येथे व्यापक स्वच्छता मोहीम नुकतीच उत्साहात राबवण्यात आली. या मोहिमेत न्यू इंग्लिश स्कूल, सातारा येथील एनसीसी व राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. सातारा वनविभागातील अधिकारी-कर्मचारी, कास पठार कार्यकारी समितीचे स्वयंसेवक यांनीही मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. कास पठारासह आजूबाजूच्या परिसरातील तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूंवरील कचरा गोळा करण्यात आला. चोरटका ते कासानी पार्किंग, मुख्य गेट ते चोरटका तसेच नवरा-नवरी डोंगर ते वेस्टर्न घाट हॉटेल या मार्गावरील कचरा साफ करण्यात आला.

कचरा साफ करणे ही सामाजिक जबाबदारी असून प्रत्येक नागरिकाने ती काटेकोरपणे राबवली पाहिजे. कचरा साफ करणे हे आरोग्य आणि पर्यावरणासाठी महत्त्वाचे आहे. ओला व सुका कचरा वेगळा करणे, दररोज डस्टबिन साफ करणे, प्लॅस्टिकचा पुनर्वापर करणे आणि कचरा वेचकांकडे ओला व सुका कचरा वेगळा देऊन घर व परिसर स्वच्छ ठेवणे ही प्रभावी कचरा व्यवस्थापनाची गुरुकिल्ली आहे कचऱ्याचे वर्गीकरण करताना ओला कचरा (अन्न, फळांची साले) आणि सुका कचरा (प्लास्टिक, कागद, काच) वेगळा करून तो कचर्याच्या डब्यामध्ये टाकणे आवश्यक आहे. ओल्या कचऱ्यापासून घरच्या घरी खत बनवता येते. कचर्यापासून टाकावू वस्तु तयार करता येतात. सध्या सातारा जिल्ह्यात अनेक सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकला जातो. धार्मिक स्थळे, मंदिरे, गडकिल्ले, सार्वजनिक बागा येथे कचरा इतस्तत: पडलेला असतो. कचरा करणे हे प्रदूषण निर्माण करण्यासारखे आहे. त्यामुळे कचरा नष्ट करणे किंवा वातावरण कचरामुक्त करण्याची जबाबदारी तुमची आमची आणि सर्वांची आहे.

नागरिकांनी कचरा रस्त्यावर, नाल्यात किंवा उघड्यावर कचरा टाकू नये. तसेच प्लास्टिकचा वापर टाळला तर कायमस्वरूपी कचरा पृथ्वीवर साठणार नाही. योग्य कचरा व्यवस्थापनामुळे प्रदूषण कमी होते आणि हरितगृह वायूचे उत्सर्जन रोखले जाते, जे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. जापानसारख्या देशात, कचरा वेळेवर टाकणे आणि तो वेचणाऱ्यांचा आदर करणे, याला शिस्त मानले जाते. कास पुष्प पठारावर राबविण्यात आलेल्या उपक्रमात वनविभागाचे कर्मचारी, अधिकारी आणि शाळेचे शिक्षक, विद्यार्थी यांनी सहभाग घेतला.

**कचरा व्यवस्थापन**

कचरा व्यवस्थापनमध्ये कचऱ्याचे संकलन , वाहतूक , प्रक्रिया आणि विल्हेवाट, तसेच कचरा व्यवस्थापन प्रक्रिया आणि कचरा-संबंधित कायदे , तंत्रज्ञान आणि आर्थिक यंत्रणा यांचे निरीक्षण आणि नियमन यांचा समावेश होतो. कचरा घन, द्रव किंवा वायू स्वरूपात असू शकतो आणि प्रत्येक प्रकारच्या विल्हेवाट आणि व्यवस्थापनाच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. कचरा व्यवस्थापनामध्ये औद्योगिक , रासायनिक , नगरपालिका , सेंद्रिय , जैववैद्यकीय आणि किरणोत्सर्गी कचऱ्यासह सर्व प्रकारच्या कचऱ्याचा समावेश होतो.

काही प्रकरणांमध्ये, कचरा मानवी आरोग्यासाठी धोका निर्माण करू शकतो. कचरा व्यवस्थापनाच्या संपूर्ण प्रक्रियेशी आरोग्याच्या समस्या निगडित आहेत. आरोग्याच्या समस्या अप्रत्यक्ष किंवा थेटपणे देखील उद्भवू शकतात. कचरा व्यवस्थापनाचा उद्देश मानवी आरोग्य , पर्यावरण , ग्रहीय संसाधने आणि सौंदर्यशास्त्र यांवर कचऱ्याचे होणारे प्रतिकूल परिणाम कमी करणे हा आहे. कचरा व्यवस्थापन करताना बराचसा खर्च येतो. त्यामुळे कचरा निर्माण न करणे, कचर्यापासून ऊर्जा, खत बनवणे फायदेशीर ठरते. कचरा व्यवस्थापन पद्धतींचा एक मोठा भाग महानगरपालिका घनकचऱ्याशी संबंधित आहे , जो घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक क्रियाकलापांमुळे निर्माण होणाऱ्या



कचऱ्याचा मोठा भाग असतो.

हवामान बदलावरील आंतर-सरकारी पॅनेलनुसार , २०५० पर्यंत महानगरपालिका घनकचरा अंदाजे ३.४ ग्रॅम पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे; तथापि, धोरणे आणि कायदे जगातील विविध क्षेत्रांमध्ये आणि शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करू शकतात. ग्लोबल ई-वेस्ट मॉनिटर २०१७ नुसार , भारत दरवर्षी सुमारे २ दशलक्ष टन ई-कचरा निर्माण करतो आणि अमेरिका, चीन, जपान आणि जर्मनीनंतर ई-कचरा निर्माण करणाऱ्या देशांमध्ये पाचव्या क्रमांकावर आहे. एडविन चॅडविक यांचा १८४२ चा कामगार वर्गाची आरोग्यविषयक स्थिती हा अहवाल, कचरा साफसफाई आणि विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने असलेला पहिला कायदा मंजूर करून घेण्यात महत्त्वपूर्ण ठरला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कचरा विल्हेवाटीसाठी भस्मीकरण यंत्रांचा वापर लोकप्रिय झाला. २० व्या शतकाच्या सुरुवातीला युरोप आणि उत्तर अमेरिकेतील इतर मोठ्या शहरांमध्येही कचरा विल्हेवाटीच्या अशाच प्रकारच्या नागरी प्रणाली उदयास आल्या.


न्यू मस्टरडॅम (आताचे न्यूयॉर्क शहर) येथे १६५४ मध्येच रस्त्यावर कचरा टाकणे बेकायदेशीर ठरवण्यात आले होते. १७०० च्या दशकाच्या मध्यात, बेंजामिन फ्रँकलिनने फिलाडेल्फियाच्या इतिहासातील पहिली कचरा संकलन आणि रस्ते साफसफाई सेवा सुरू केली.

**औद्योगिक सांडपाणी**

बहुतेक उद्योग काही प्रमाणात सांडपाणी तयार करतात. अलीकडील काळात असे उत्पादन कमी करणे किंवा उत्पादन प्रक्रियेमध्येच प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करणे हा कल राहिला आहे. काही उद्योगांनी प्रदूषके कमी करण्यासाठी किंवा पूर्णपणे काढून टाकण्यासाठी त्यांच्या उत्पादन प्रक्रियांची पुनर्रचना करण्यात यश मिळवले आहे. कचरा व्यवस्थापनाची एक महत्त्वाची पद्धत म्हणजे कचरा निर्माण होण्यापासून रोखणे, ज्याला कचरा कमी करणे असेही म्हणतात. कचरा कमी करणे म्हणजे नाविन्यपूर्ण किंवा पर्यायी कार्यपद्धतींचा सखोल वापर करून घातक कचऱ्याचे प्रमाण कमी करणे. टाळण्याच्या पद्धतींमध्ये सेकंड-हँड उत्पादनांचा पुनर्वापर करणे, नवीन वस्तू खरेदी करण्याऐवजी तुटलेल्या वस्तू दुरुस्त करणे, उत्पादने पुन्हा भरता येण्याजोगी किंवा पुनर्वापर करण्यायोग्य बनवणे (जसे की प्लास्टिकच्या शॉपिंग बॅगऐवजी कापसाच्या पिशव्या वापरणे), ग्राहकांना डिस्पोजेबल उत्पादने (जसे की डिस्पोजेबल कटलरी ) वापरणे टाळण्यासाठी प्रोत्साहित करणे, डबे आणि पॅकेजिंगमधून अन्नाचे/द्रवाचे अवशेष काढून टाकणे, आणि समान उद्देश साध्य करण्यासाठी कमी साहित्य वापरणारी उत्पादने तयार करणे (उदाहरणार्थ, शीतपेयांच्या डब्यांचे वजन कमी करणे) यांचा समावेश आहे.

# भगवान महावीर:आदर्श विचार

**सौ. स्नेहा मुसरीफ**
**पुणे**



भगवान महावीर जयंती हा जैन धर्मातील सर्वात महत्त्वाचा सण आहे. हा दिवस जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा केला जातो. महावीर जयंती हा सण चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील त्रयोदशी या दिवशी साजरा केला जातो. हा दिवस दरवर्षी मार्च किंवा एप्रिल महिन्यात येतो. यंदा मंगळवारी म्हणजेच ३१ मार्च २०२६ रोजी महावीर जयंती आहे. भगवान महावीर यांचा जन्म इ.स.पू. ५९९ मध्ये बिहार राज्यातील कुंडलपूर येथे झाला. त्यांना ७२ वर्षे जगल्यानंतर ५२७ ई.स. पूर्व मध्ये पावापुरी (बिहार) येथे कार्तिक कृष्ण अमावस्येला मोक्ष प्राप्त झाला. त्यांचे वडील सिद्धार्थ आणि आई त्रिशला होते. त्यांचे बालपणाचे नाव 'वर्धमान' होते. त्याना 'वीर', 'अतिवीर ', 'सन्मति' या नावानी सुद्धा ओळखले जात असे. भगवान महावीरांचा जन्म राजघराण्यात झाला. सर्व सुखसोयी त्यांच्या पायाशी होत्या. पण त्यांनी हे जाणले की खरे सुख बाह्य वैभवात नसून अंतर्मनाच्या शांततेत आहे. म्हणूनच वयाच्या ३० व्या वर्षी त्यांनी राजसुख, संपत्ती आणि कुटुंबाचा त्याग करून वैराग्याचा मार्ग स्वीकारला.१२ वर्षे त्यांनी कठोर तपश्चर्या केली, अनेक संकटांना तोंड दिले, अपमान सहन केला. त्यांना ऐश्वर्यापेक्षा साधेपणा आणि शांत जीवन अधिक आवडत असे. काही परंपरांनुसार, त्यांचा विवाह यशोदा नावाच्या स्त्रीशी झाला होता आणि त्यांना प्रियदर्शना नावाची मुलगी होती. मात्र, काही जैन परंपरा त्यांना अविवाहित मानतात. असा, त्यांच्या वैयक्तिक जीवनाबद्दल थोडासा मतभेद दिसतो. वयाच्या सुमारे ३० व्या वर्षी त्यांनी संसाराचा त्याग केला.आई-वडिलांच्या निधनानंतर त्यांनी राजसुख, संपत्ती आणि कुटुंब सोडून संन्यास (वैराग्य) स्वीकारला.

संन्यास घेतल्यानंतर त्यांनी १२ वर्षे कठोर तप केले. कमी अन्न घेणे, मौन पाळणे, ध्यानधारणा करणे, सर्व प्रकारच्या सुखांचा त्याग, अशा प्रकारे त्यांनी स्वतःला पूर्णपणे शिस्तीत ठेवले. अत्यंत साधे जीवन ते जगले. ते नग्न साधू म्हणून (दिगंबर परंपरेनुसार) जगले, म्हणजेच त्यांनी कोणतीही भौतिक वस्तू जवळ ठेवली नाही. त्यांचे जीवन पूर्णपणे अपरिग्रह (काहीही न साठवणे) या तत्त्वावर आधारित होते. सर्वांबद्दल समान भावना त्यांच्या मनात होती.ते कोणत्याही व्यक्तीशी भेदभाव करत नसत. गरीब असो किंवा श्रीमंत, माणूस असो किंवा प्राणी ! ते सर्वांशी समान प्रेमाने वागत.भगवान महावीरांचे खाजगी जीवन आपल्याला शिकवते की खरे सुख बाहेरच्या गोष्टींमध्ये नसून, आत्मशांती, संयम आणि साधेपणात असते. आधी स्वतः केले आणि मग जगाला सांगितले अशी त्यांची खरी थोरवी होती. नाहीतर पुस्तकी ज्ञान, भाषणे,उपदेश तर कित्येकदा केले जातातपण त्यांनी ते स्वतः आधी करून मग उपदेश केल्यामुळे ते लोकांच्या मनाला पटतात. भगवान महावीरांनी मानवाला शांत, संयमी आणि नैतिक जीवन जगण्यासाठी काही मूलभूत तत्त्वे दिली. ही तत्त्वे आजही अत्यंत उपयुक्त आहेत. महावीर म्हणजे केवळ एक नाव नाही, तर तो आहे अहिंसा, सत्य आणि मानवतेचा जिवंत संदेश!

जैन मंदिरांमध्ये भगवान महावीरांची पूजा केली जाते. त्यांच्या शोभायात्रा म्हणजेच मिरवणुकाकाढल्या जातात. ठिकठिकाणी दानधर्म आणि सेवा कार्य केले जाते. गरीबांना अन्न व वस्त्र वाटप केले जाते. त्यांच्या शिकवणीचे प्रवचन दिले जाते. महावीर जयंती आपल्याला शांतता, अहिंसा आणि साधे जीवन जगण्याचा संदेश देते. आजच्या काळातही त्यांचे विचार खूप उपयोगी आहेत. भगवान महावीर जयंती हा केवळ सण नसून, तो मानवतेचा आणि चांगल्या जीवनमूल्यांचा उत्सव आहे. त्यांच्या शिकवणीनुसार वागलो तर समाज अधिक शांत आणि सुखी होईल.

भगवान महावीर यांच्या जीवनावर आधारित काही प्रेरणादायी किस्से खाली दिले आहेत. एकदा भगवान महावीर ध्यान करत असताना एक विषारी साप त्यांच्या जवळ आला. लोक घाबरले, पण महावीर शांतच राहिले. त्यांनी सापाला प्रेमाने सांगितले, तूही जीव आहेस, राग सोड. महावीरांच्या शांततेने सापही शांत झाला आणि निघून गेला. या कृतीतून त्यांनी अहिंसा हाच खरा धर्म आहे, ही शिकवण साऱ्यांना दिली. अपमान सहन करण्यासाठी खूप संयम, आणि मनाच्या ताकदीची गरज असते. ती त्यांनी आत्मासात केली होती.

महावीर स्वामी तप करत असताना काही लोकांनी त्यांची थट्टा केली, अपमान केला, पण त्यांनी कधीही राग व्यक्त केला नाही. ते नेहमी शांत राहिले आणि सहनशीलतेने सर्व सहन केले.त्यांच्यातील दया आणि करूणेचा प्रसंग सांगितला जातो. एकदा त्यांनी पाहिले की एक माणूस प्राण्यांना त्रास देत होता. महावीरांनी त्याला समजावले की सर्व जीवांना जगण्याचा अधिकार आहे. त्या व्यक्तीला आपली चूक कळली आणि त्याने हिंसा सोडली. हे सर्व किस्से आपल्याला शिकवतात की अहिंसा, सत्य, संयम, दया आणि साधेपणा या गुणांनी जीवन अधिक सुंदर आणि शांत बनते. यातूनच त्यांनी जगाला दिला एक अमूल्य संदेश, स्वतःवर विजय मिळवणे हाच खरा पराक्रम आहे. भगवान महावीरांनी दिलेली पाच तत्त्वे म्हणजे जीवनाचा खरा मार्गदर्शक आहेत.

ती अशी आहेत.. ✻अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. ✻ अहिंसा: म्हणजे फक्त कोणाला मारू नये एवढेच नाही, तर कोणालाही मनाने, वाणीने किंवा कृतीने दुखावू नये. ✻सत्य: म्हणजे केवळ खरे बोलणे नाही, तर सत्याने जगणे. ✻ अपरिग्रह: म्हणजे अनावश्यक गोष्टींचा त्याग करून साधे जीवन जगणे.जास्त संपत्ती, वस्तू किंवा लोभ यापासून दूर राहावे.✻ अस्तेय: इतरांची वस्तू परवानगीशिवाय घेऊ नये.प्रामाणिकपणा आणि प्रामाणिक जीवनावर भर देण्याचा प्रयत्न करावा असा याचा अर्थ आहे. ✻ ब्रह्मचर्य: इंद्रियांचे नियंत्रण ठेवून शुद्ध आणि संयमी जीवन जगावे.मन, वाणी आणि शरीर यांवर नियंत्रण ठेवणे.मनाचा संयम हा सर्वात महत्वाचा असतो.असा संदेश त्यांनी सर्वांना दिला आहे.ही पाच तत्त्वे जैन धर्माचे मुख्य आधार आहेत.

यां पाच तत्वांसोबतच त्यांनी आणखीही काही छान तत्वे अंगीकरण्यास सांगितली आहेत. त्यातील पुढचे म्हणजे सहावे तत्व म्हणजे. ✻ अनेकांतवाद: प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात.आपले मतच बरोबर आहे असे न मानता इतरांचे विचारही समजून घ्यावेत. ७. क्षमा: इतरांच्या चुका माफ कराव्यात. राग न ठेवता मन शांत ठेवावे. ८. समता:सर्व जीव समान आहेत. कोणावरही भेदभाव ,अन्याय करू नये. जर आपण त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केला, तर आपले जीवन नक्कीच सुंदर होईल.

महावीर जयंती आपल्याला शांतता, अहिंसा आणि साधे जीवन जगण्याचा संदेश देते. आजच्या काळातही त्यांचे विचार खूप उपयोगी आहेत. भगवान महावीर जयंती हा केवळ सण नसून, तो मानवतेचा आणि चांगल्या जीवनमूल्यांचा उत्सव आहे. त्यांच्या शिकवणीनुसार वागलो तर समाज अधिक शांत आणि सुखी होईल. आजच्या या पवित्र दिवशी आपण एक संकल्प करूया.कोणालाही दुखावणार नाही. नेहमी सत्याचा मार्ग स्वीकारू. लोभ आणि रागापासून दूर राहू. जगा आणि जगू द्या हा भगवान महावीरांचा संदेश आपल्या प्रत्येकाच्या जीवनात उतरला तर आपला देश मानवतेच्या दृष्टीने उच्च स्थानावर पोहोचेल यात तिळमात्र शंकाच नाही. फक्त भारतातच नाही,तर जगभरातील लोकांनी त्यांचे विचार अंगिकारले तर जगातील सर्व वैरभाव संपून शांतता प्रस्थापित होईल. आता ही काळाची खरी गरज आहे.

## मारामारी करणाऱ्यांच्या विरोधात गुन्हा

**सातारा/ प्रतिनिधी:-**

शाहूपुरी पोलीस ठाण्यासमोर गर्दी जमवून मारामारी करणाऱ्या पाच जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.२६ रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी महिला पोलीस हवालदार माधुरी शिंदे यांनी फिर्याद दिली असून विष्णू सुनील काळे, जयश्री सुनील काळे, कमळ काळे, (तिघे रा.माजगावकर माळ झोपडपट्टी आकाशवाणी केंद्राजवळ, सातारा) तसेच दिनेश काफ्या काळे (रा. जरेवाडी) आणि सुप्रिया विशाल काळे (रा.त्रिपुटी ता. कोरेगाव जि.सातारा)अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. सर्वांनी एकमेकांना शाहूपुरी पोलीस स्टेशन समोर मारहाण करून सार्वजनिक शांततेचा भंग केला आहे.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयातील हृदय द्रावक आठवणीनी विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले

## बीए,बीकॉम व बीएससी च्या विद्यार्थ्यांना निरोप

**अक्कलकोट/महेश गायकवाड:-**

महाविद्यालयात मित्रांसोबत दंगा मस्ती केली त्यातून ऋणानुबंध जुळले, शिक्षकांनी केलेले अध्यापन हृदयाला जाऊन भिडले, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय घडामोडींचा अभ्यास केला, संदर्भ ग्रंथातून घटनांचे धागेदोरे उलगडले गेले, त्यामुळेच स्पर्धा परीक्षेत अव्वल येण्याची स्वप्ने पाहिली, ती साकारण्यासाठी आता परिश्रम घेणार आणि महाविद्यालयास गोल्ड मेडल मिळवून देणार अशी शपथ घेत बीए,बीकॉम व बीएस्सी च्या विद्यार्थ्यांनी कल्याणशेट्टी महाविद्यालयाचा निरोप घेतला. यावेळी हृदय द्रावक आठवणीने अक्षरशः विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, पुढील आयुष्य हे स्पर्धेचे आहे, त्यासाठी मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वास आवश्यक आहे. आयुष्यात मूल्यांची जपणूक करा.



कल्याणशेट्टी महाविद्यालयात निरोप समारंभ प्रसंगी मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्यासोबत बीए बीकॉम बीएस्सी चे विद्यार्थी.

प्रामाणिकपणा, शिस्त, आणि जबाबदारी या गुणांमुळेच तुमची प्रतिमा उंचावणार आहे. तुमच्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी धैर्याने पुढे जा. तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. तुम्ही आपल्या यशाने कुटुंबाचे, महाविद्यालयाचे आणि समाजाचे नाव उज्ज्वल करा असा संदेश दिला.

पुनम कोकळगी म्हणाल्या की, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर यश, समाधान आणि आनंद मिळवण्यासाठी प्रयत्न करा आमचे आशीर्वाद सदैव तुमच्यासोबत आहेत.

प्रारंभी सानिया शेख, पायल कांबळे, प्रा भीम सोनकांबळे, डॉ शितल झिंगाडे-भस्मे, सौरभ भस्मे, राजशेखर पवार, यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन समर्थ पवार यांनी केले तर आभार शकुंतला कोरे यांनी मानले.

# सोलापूर पंढरपूर-शेगाव रेल्वे मार्गाला गती द्यावी

## खा. ओमराजे निंबाळकर यांची लोकसभेत मागणी

**सोलापूर/महेश गायकवाड:-**

सोलापूर पंढरपूर धाराशिव शेगाव या रेल्वे मार्गाच्या कामाला तातडीने गती द्यावी अशी मागणी धाराशिव चे खासदार ओमराजे यांनी लोकसभेत बोलताना केली.

पंढरपूर-शेगाव नवीन रेल्वेमार्ग मंजूर करण्याची मागणी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी यावेळी केली. सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांसाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा असून, तो लाखो भाविकांच्या श्रद्धेशी निगडित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लोकसभेत बोलताना त्यांनी पंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व शेगाव गजानन महाराज मंदिर ही राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रे असल्याचे सांगितले. दरवर्षी कोट्यवधी भाविक येथे येतात; मात्र थेट रेल्वे मार्ग नसल्याने प्रवासात अडचणी निर्माण होतात. प्रस्तावित मार्ग पूर्ण झाल्यास प्रवास अधिक सुलभ, जलद व सुरक्षित होईल, तसेच मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र रेल्वेने जोडले जातील. असेही त्यांनी स्पष्ट केले. पंढरपूर शेगाव नवीन रेल्वे

प्रकल्प केवळ धार्मिक पर्यटनापुरता



मर्यादित नसून व्यापार, उद्योग, शेतीमाल वाहतूक व रोजगारनिर्मितीस चालना देणारा ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. भूम व परंडा तालुक्यातील नागरिकांनी 'रेल्वे संघर्ष समिती'च्या माध्यमातून सातत्याने लढा उभारला असून सरकारने याची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.दरम्यान, केंद्र सरकारने तातडीने सर्वेक्षणासाठी निधी उपलब्ध करून हा रेल्वेमार्ग मंजूर करावा, अशी मागणी खा. राजेनिंबाळकर यांनी रेल्वेमंत्र्यांकडे केली.

# रुग्णांवर औषधोपचार करणारे राज्यभरात अनेक 'मुन्नाभाई बाबा'

## सोशल मीडियातून विस्तारले जाळे; अन्न व औषध प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष

**सोलापूर/महेश गायकवाड:-**

रुग्णांवर औषधोपचार करणारे राज्यभरात अनेक 'मुन्नाभाई बाबा' निर्माण झाले असून अशा मुन्ना भाई बाबा लोकांमुळे महाराष्ट्र पुरता बदनाम होत चालला आहे. सोशल मीडियातून या बाबा लोकांचे जाळे विस्तारले आहे. तरीही राज्याचे; अन्न व औषध व प्रशासनाचेखाते मात्र याकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष करत आहे. या खात्याचे झालेले दुर्लक्ष हे राज्याचे नुकसान करणारे आहे असे स्पष्ट मत राज्यातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि नाशिक भूषण भागवत यांनी व्यक्त केले आहे.

नाशिकसह राज्यभरात अंधश्रद्धेच्या आडून सुरू असलेल्या 'मुन्नाभाई बाबा' संस्कृतीचे धक्कादायक वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. भोंदूगिरी, जादूटोणा आणि तथाकथित आध्यात्मिक उपचारांच्या नावाखाली केवळ लोकांची फसवणूकच नव्हे, तर त्यांच्या जीवाशीही खेळ सुरू असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. अशोक खरात प्रकरणानंतर या स्वयंघोषित 'डॉक्टरां'चे जाळे किती खोलवर पसरले आहे, याची माहिती घेतली असता गंभीर वास्तव पुढे येते. कोणतेही वैद्यकीय शिक्षण घेतलेले नसताना 'मुन्नाभाई एमबीबीएस' चित्रपटाच्या धर्तीवर हे बाबा सर्रासपणे गंभीर आजारांवर उपचार करण्याचे दावे करत आहेत, इतकेच नव्हे तर आपत्यप्राप्तीसारख्या संवेदनशील विषयांवरही औषधोपचार देत असल्याचे उघड झाले आहे.

सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाचा गैरफायदा घेत हे भोंदू बाबा इन्स्टाग्राम, फेसबुक आणि यूट्यूबसारख्या माध्यमांवरून मोठ्या प्रमाणावर जाहिरातबाजी करत आहेत. अन्न व औषध प्रशासनासारख्या यंत्रणांकडून अपेक्षित ती कठोर कारवाई होत नसल्याने, या बेकायदेशीर आणि धोकादायक व्यवसायाला अक्षरशः उघड मोकळीक न मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

राज्यभरात स्वतःला बाबा म्हणवून घेणारे अनेक जण फसवणुकीच्या अशा गोरखधंद्यात व्यस्त आहेत. नाशिक जिल्ह्यातही असे काही बाबा कार्यरत आहेत. संभाजीनगर जिल्ह्यात तर एक बाबा दारूचे व्यसन सोडविण्यासाठी भक्तांना अमानुष वागणूक देत असल्याचे समोर आले होते. मुंबईजवळ एक बाबा गुडघेदुखी बरी करत असल्याचे सांगितले जाते. कोरोना काळात तर अनेक बाबा मंत्रोच्चाराने कोरोना बरा करून देण्याचा दावा करत होते. अनेकदा भोंदूबाबा लोकांच्या आजारांवर 'जादू-टोणा' किंवा 'दैवी उपाय' करून उपचार करण्याचा दावा करतात. यामुळे लोकांचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण होते.

अंधश्रद्धेमुळे अनेकदा महिलांना अशा बुवाबाबांच्या जाळ्यात ओढले जाते, जिथे त्यांच्यावर अत्याचार किंवा शोषण होण्याची शक्यता असते. कॅन्सरसारखे दुर्धर आजार कोणत्याही



महागड्या औषधांशिवाय बरा करून देतो, मुल होत नसेल तर अमुक एक औषध घ्या, दारू, तंबाखूपासून सुटका, त्वचारोग आदी आजारांबाबत आता भोंदूबाबा उपचार करू लागले आहेत. साध्या आजारांवरही दैवी कारण सांगून हे भोंदूबाबा उपचार करतात. या औषधोपचारांत वैद्यकीय शास्त्रीय आधार नसतो. तरीही श्रद्धेपोटी, कमी खर्चात या आजारातून सुटका व्हावी, याकरिता नागरिकही या भोंदूंच्या जाळ्यात अडकत असल्याचे दिसून येते. जिल्ह्यातही असे अनेक बाबा, बुवा, ढोंगी डॉक्टरांचा सुळसुळाट झाला आहे.

### सोशल मीडियावर प्रचार-प्रसार

सोशल मीडियाचा वाढता वापर लक्षात घेता या बाबांचे सोशल मीडियावर स्वतंत्र अकाउंटही दिसून येते. या औषधोपचार पद्धतीला कोणताही वैज्ञानिक आधार नसताना आणि मुळात संबंधितांना याचे कोणतेही ज्ञान नसताना सर्रासपणे दुर्धर आजारांवरील औषधे दिली जातात; परंतु, पोलीस अथवा अन्न व औषध प्रशासनाकडून यावर कोणतीही कारवाई होत नसल्याचे दिसून येते.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 ✻मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, ✻ सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

## राजारामबापू यांच्या स्मरणार्थ कुस्ती स्पर्धेत

# समीर पठाण प्रथम क्रमांकाचे मानकरी

**ईश्वरपूर / प्रतिनिधी:–**

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याच्या लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या स्मरणार्थ आयोजित मुला-मुलींच्या मानधन कुस्ती स्पर्धेच्या खुल्या गटात जुनेखेडच्या समीर पठाणने भडकंबेच्या शिवरुद्र जंगमवर गुणांनी मात करून प्रथम क्रमांक पटकाविला. या गटात ऋषिकेश कदम महादेववाडी हा तिसरा विजेता ठरला आहे. सर्व विजेत्यांना राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील, राजाराम बापू सहकारी बँकेचे अध्यक्ष विजयराव यादव, राजारामबापू सहकारी दूध संघाचे अध्यक्ष संग्राम फडतरे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. राजारामबापू कुस्ती केंद्रात गेल्या दोन दिवसापासून ही स्पर्धा मोठया उत्साहात पार पडली. या स्पर्धेतील चटकदार कुस्त्यांनी कुस्ती शौकीनांच्या डोळ्याचे पारणे फिटले.

स्पर्धेचा निकाल– ९७ किलो गट –प्रथम–रोहन पाटील सुरुल, द्वितीय – यशराज पाटील औंढी, तृतीय– शंतनू ताटे ईश्वरपूर, ९२ किलो गट– प्रथम –शिवकरण पाटील डोंगरवाडी, द्वितीय –मनिष पवार मसूचीवाडी, तृतीय –प्रथमेश कदम रेठरे धरण

८६ किलो गट– प्रथम –सुनिल बंडगर सुरुल, द्वितीय –आशिष शिंगाडे ईश्वरपूर, तृतीय –सिद्धार्थ पाटील राजारामबापू कुस्ती केंद्र, ७९ किलो गट– प्रथम –रितेश गावडे वाटेगांव द्वितीय–रोहित कोळेकर सुरुल, तृतीय –स्वरूप गावडे नेर्ले,७४ किलो गट– प्रथम –सिद्धार्थ पाटील सुरुल, द्वितीय –प्रणव भोसले पेठ, तृतीय –ऋषिकेश मोहिते महादेववाडी, ७० किलो गट– प्रथम –तेजस पाटील सुरुल, द्वितीय –प्रतिक पाटील सुरुल,तृतीय –सुमित किल्लेदार भाटवडे, ६५ किलो गट– प्रथम –सतिश सूर्यवंशी काळमवाडी,द्वितीय –दिगंबर पाटील अंत्री,तृतीय –गणेश कोळेकर सुरुल,६१ किलो गट– प्रथम –ऋतुराज साळुंखे ताकारी,द्वितीय –हरीश खरात खरातवाडी,तृतीय–ओम कदम औंढी,५७ किलो गट– प्रथम –ओम जाधव भाटवडे,द्वितीय –सुमित सुतार सुरुल,तृतीय –तेजस शिंदे येडेनिपाणी,५० किलो गट– प्रथम – सम्राट पाटील सुरुल,द्वितीय –धैर्यशील पाटील साखराळे,तृतीय –सुजल जाधव औंढी,४५ किलो गट– प्रथम –शुभम मासाळ कसबे डिग्रज, द्वितीय –विनायक जाधव येडेनिपाणी, तृतीय –वैभवराजे माने येडेनिपाणी,४० किलो गट– प्रथम –स्वरूप ढेकळे नेर्ले, द्वितीय –राजवीर घाडगे येडेनिपाणी, तृतीय –राजवीर झेंडे काळमवाडी



मुली–७२ किलो गट– प्रथम–वैष्णवी सावंत काळमवाडी, द्वितीय–श्रेया शिंदे बोरगाव,६१ किलो गट– प्रथम –श्रावणी सावंत काळमवाडी, द्वितीय– तेजस्विनी जाधव नागराळे,५५ किलो गट– प्रथम –श्रद्धा सावंत काळमवाडी, द्वितीय –तनया सावंत काळमवाडी,५० किलो गट– प्रथम –तनुष्का देवकर भाटवडे ,द्वितीय –रितिका सावंत कवठेपिरान, ४५ किलो गट– प्रथम – शिवानी वडिगे कवठेपिरान, द्वितीय –वैष्णवी सावंत काळमवाडी,तृतीय –श्रीशा साठे नेर्ले, ४० किलो गट– प्रथम –श्रावणी भालेराव बोरगाव,द्वितीय –जानवी झेंडे काळमवाडी, ३५ किलो गट–प्रथम –स्वराली पाटील कवठेपिरान, द्वितीय –ज्ञानेश्वरी माळी कासेगाव.

हणमंत जाधव पुणदी, विनायक पाटील बोरगाव,अनिल बाबर रेठरे हरणाक्ष,संदीप पाटील वारणानगर, जयदीप पाटील माले, सुहास पाटील कवलापूर, धनंजय महाडिक नेर्ले यांनी पंच म्हणून जबाबदारी पार पाडली. ईश्वरा पाटील येलूर यांनी स्पर्धेचे सुंदर स्मालोचन केले.

प्रत्येक गटातील प्रथम तीन विजेत्यांना मल्लांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र बक्षीस देण्यात आले. तसेच प्रत्येक गटातील पहिल्या विजेता मल्लास रुपये २ हजारापासून रुपये ५ हजारापर्यंत मासिक मानधन आणि प्रतिदिन एक लिटर दूध दिले जाणार आहे.

याप्रसंगी सौ.छाया पाटील, संचालक कार्तिक पाटील, प्रा.डॉ. योजना शिंदे पाटील,पै.भगवान पाटील, नगरसेवक स्वरूप मोरे, राजकुमार कांबळे, हणमंत माळी, दिलीपराव पाटील,बंडा नांगरे, पै. अशोक मोरे, कार्यकारी संचालक विजय मोरे, सचिव डी.एम. पाटील, कुस्ती प्रशिक्षक कुंडलिक गायकवाड, नितीन सलगर यांच्यासह परिसरातील मान्यवर व कुस्ती शौकीन उपस्थित होते.

## वसंतगडावरील वृक्ष संवर्धनासाठी तळबीड पोलीस सक्रिय

### सपोनि रविंद्र भोरे यांचा सहभाग

**चरेगाव/प्रतिनिधी: –**

ऐतिहासिक किल्ले वसंतगडावर वृक्ष संवर्धनासाठी सुरू असलेल्या उपक्रमाला आता नवे बळ मिळाले आहे. टीम वसंतगड, शिवप्रेमी संस्था आणि शिवमावळ्यांच्या पुढाकारातून सुरू असलेल्या या हरित चळवळीत तळबीड पोलीस ठाण्यानेही सक्रिय सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले आहे.

किल्ले वसंतगड परिसरात लावण्यात आलेल्या झाडांच्या संगोपनासाठी पाणी देणे, त्यांची देखभाल करणे यासाठी टीम वसंतगड सातत्याने कार्यरत आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर झाडे जिवंत ठेवण्याची मोठी जबाबदारी असताना, आता तळबीड पोलिसांनीही या मोहिमेत हातभार लावत झाडांना पाणी घालण्याचा उपक्रम राबवला आहे.

या उपक्रमात तळबीड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र भोरे, पोलीस हवालदार चौगुले, पोलीस नाईक दीक्षित, कॉन्स्टेबल गणेश बाकले, अभय मोरे, सागर कोकरे, सीमा करपे



यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. तसेच उंब्रज पोलीस ठाण्याचे अनिल देशमुख, सुनिता पवार, होमगार्ड अक्षय नेवगे आणि प्रथमेश कदम यांनी योगदान दिले.

यासोबतच टीम वसंतगडचे रामभाऊ माळी, सौरभ शिंदे, किशोर पांढरपट्टे, राज ओव्हाळ आणि देवदास पाटील, तसेच बाळासाहेब ढवळे, दत्तात्रेय माळी यांनीही या उपक्रमात सक्रिय भूमिका बजावली. सर्वांनी मिळून किल्ल्यावर लावलेल्या झाडांना पाणी घालत त्यांचे संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

इतिहासाचा साक्षीदार असलेल्या किल्ले वसंतगडाचे पर्यावरणीय सौंदर्य जपण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. केवळ वृक्षलागवड न करता त्यांचे संगोपन करणे ही खरी जबाबदारी असून, त्यासाठी प्रशासन, पोलीस यंत्रणा, सामाजिक संस्था आणि नागरिक एकत्र येत असल्याचे चित्र समाधानकारक असल्याचे मत यावेळी सपोनि रविंद्र भोरे यांनी व्यक्त केले.

## डोंगरी महोत्सव कालावधीत चोख पोलीस बंदोबस्त

### पालकमंत्री शंभूराज देसाई:एसटीच्या जादा बसेस सोडणार

**सातारा/प्रतिनिधी:–**

डोंगरी महोत्सव येत्या २ ते ६ एप्रिल २०२६ या कालावधीत मरळी ता. पाटण येथे होणार असून महोत्सवाला पाटण तालुक्यातील नागरिकांची गर्दी होत असते त्यामुळे महोत्सव कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येईल, गर्दीचे आणि वाहतुकीचे व्यवस्थापन ही अतिशय चांगले करण्यात येईल, असे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात डोंगरी महोत्सवाच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीत पालकमंत्री श्री. देसाई बोलत होते. या बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक विश्वास सिद्ध, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, आत्माचे प्रकल्प संचालक अजय शेंडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

महोत्सव कालावधीत मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार असल्याने वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पोलीस विभागाने दक्षता घ्यावी. लोकांच्या येण्या–जाण्याची व्यवस्था चांगली रहावी यासाठी एसटी महामंडळाने नियोजन केले असून त्यामध्ये जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, डोंगरी महोत्सवाल पाटण तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहत असतात त्यांना हुल्लडबाजांकडून कोणताही त्रास होऊ नये, कोणत्याही महिलेची छेड काढली जाऊ नये यासाठी साध्या वेशातील



पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. पोलिसांनी महिलांच्या व बालकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे. डोंगरी महोत्सवाला जास्तीत जास्त नागरिक उपस्थित राहण्यासाठी परिवहन विभागाने ज्यादाच्या एसटी बसेस सोडावेत, असेही निर्देश पालकमंत्री श्री. देसाई यांनी दिले.

कोयना दौलत डोंगरी महोत्सवाकरिता प्रवाशांना जाण्या-येण्याच्या सुविधेसाठी दि.२ ते ६ एप्रिल या कालावधीत एसटी महामंडळा केलेले गाड्यांचे नियोजन पुढील प्रमाणे. मरळी कारखाना येथून नवा रस्ता परिसरातील प्रवाशांकरिता प्रत्येक तीस मिनिटाला बसेस निघतील.

पाटण परिसरातील प्रवाशांसाठी नवा रस्ता ते मरळी कारखाना या मार्गावर जाता येता प्रत्येकी ३० मिनिटाला फेऱ्याची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच पाटण–मरळी–ढेबेवाडी या मार्गावर प्रत्येकी ४५ मिनिटाला बस ची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच केळोली, पाडळोशी, जळव तारळे, सडावाघापूर तारळे, कोयना, जिंती, सळवे, काळगाव, वाल्मिक, वनकुसवडे, कुसरुंड व चोरे या परिसरातील प्रवाशांसाठी मरळी कारखाना येथून शेवटची बस रात्री १०.३० वाजता सुटेल. तसेच परिवहन खात्यामार्फत गोकुळ धरण काहिर हुंबरणे पांढरपाणी आटोली मुरुड घाटेवाडी चाफोली गोवारे कुंभरगाव या गावांसाठी बस ची व्यवस्था करण्यात आली आहे

पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांचा सत्कार १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम' प्रभावीपणे राबवून सातारा जिल्हा परिषदेने शंभर टक्के गुण मिळवत राज्यात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांचा गौरव करण्यात आला होता. या गौरवपूर्ण कामगिरीबद्दल पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांचा सत्कार केला. सातारा जिल्ह्यासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. जिल्हा परिषदेने मिळवलेले हे यश प्रशासनाच्या कष्टाचे फळ आहे. भविष्यातही जिल्ह्याच्या विकासासाठी असेच उत्कृष्ट काम व्हावे, अशा शब्दांत पालकमंत्र्यांनी कौतुक केले.

## नियामक आयोगाने राज्यातील वीज ग्राहकांच्या तोंडाला पाने पुसली

### सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने जाहीर सुनावणीचे नाटक ; दरवाढ तशीच

**विटा/ प्रतिनिधी:–**

सर्वोच्च न्यायालयाचे ताशेरे व आदेशाने राबविण्यात आलेल्या बहुचर्चित नियामक आयोगाच्या फेरसुनावणीवरील आदेशाची प्रतीक्षा नुकतीच संपली असून आयोगाने २७ मार्च रोजी जाहीर केलेला आदेश म्हणजे केवळ सुनावणीचे नाटक ठरले असुन किरकोळ तांत्रिक बदल वगळता आयोगाने आपला जुन २०२५ चा वाढीव वीज दराचा आदेश जवळपास तसाच पुन्हा लागु केला आहे. आयोगाच्या मुळ मार्च २०२५ च्या आदेशाच्या तुलनेत लादलेली मोठी वीजदरवाढ तशीच सुरु राहणार आहे. नियामक आयेगाने केवळ वारंवार सुनावणी घेत प्रत्यक्षात मात्र वीज ग्राहकांच्या तोंडाला पाने पुसली आहेत, असा आरोप महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे सदस्य किरण तारळेकर यांनी केला आहे.

वीज नियामक आयोगाने महावितरणच्या नोव्हेंबर २०२४ च्या पंचवार्षिक दरवाढ याचिकेवर २८ मार्च २०२५ रोजीच्या आदेशाने नियमबाह्य वीज गळती नामंजुर करीत वीज ग्राहकांना दिलासा देणारा ऐतिहासिक दरकपात निकाल जाहीर केला. मात्र महावितरणने या निकालावर फेरविचार याचिका दाखल केल्याने नियामक आयोगाने आपल्याच आदेशाला केवळ चार दिवसांत स्थगिती देऊन,२५ जुन २०२५ रोजी नविन दरवाढ मंजुर करणारा फेर निकाल दिला होता. फेरविचार याचिकेचा निकाल देण्यापुर्वी वीज ग्राहकांना बाजु मांडण्याची संधी देण्यात आली नव्हती. ही एकतर्फी दरवाढ १ जुलै २०२५ पासुन लागु झाली आहे.





महावितरणच्या फेरविचार याचिकेवर कोणतीही सुनावणी न घेता एकतर्फी लादलेल्या या दरवाढीच्या आदेशावर राज्यातील अनेक वीजग्राहकांनी उच्च न्यायालयात नियमबाह्य दरवाढ व आदेश रद्द करण्याची मागणी केली होती. या तक्रारीवर मुंबई उच्च न्यायालयाने नियमबाह्य फेरविचार आदेशानुसार लादलेली दरवाढ रद्द करुन नियामक आयोगाच्या २८ मार्च २०२५ रोजीच्या मुळ आदेशाची अंमलबजावणी सुरु ठेवण्याचे आदेश ०३ नोव्हेंबर २०२५ रोजी दिले होते. यावर महावीतरणने सर्वोच्च न्यायालयात दाद मागीतली. सर्वोच्च न्यायालयानेही ग्राहकांना दिलासा देत उच्च न्यायालयाचा निर्णय अंतिम केला व आयोगाला याबाबत पुन्हा सुनावणी घेण्याचे आदेश दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यात पाच ठिकाणी जाहिर सुनावणी झाली. हजारो ग्राहकांनी सुनावणीत भाग घेऊन वीजदरवाढीस विरोध दर्शवला होता. सुनावणी दरम्यान नियामक आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष संजीवकुमार यांनी अचानक मुदतपुर्व राजीनामा दिला व त्यांचे जागी निवृत्त सचिव वल्सा नायर सिंग यांची नियुक्ती झाली. फेरविचार याचिकेवरचा अंतिम निकालपत्र तयार करण्याचे काम सुरु असताना घडलेल्या राजीनामाप्रकारामुळे हरकतीमध्ये भाग घेतलेल्या अकरा हजार हरकतदारांमध्ये संभ्रमाचे व संशयाचे वातावरण निर्माण झाले होते.

ग्राहक संघटनांच्या आक्षेपानंतर नव्या अध्यक्षा वल्सा सिंग यांनी पुन्हा जाहीर सुनावणी घेतली व वीज ग्राहकांची बाजु एकुन घेऊन तब्बल महिनाभरानंतर २७ मार्च २६ रोजी आयोगाचा २५ जुन २०२५ चा दरवाढीचा आदेश अंतिम केल्याचे दिसत आहे. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश होता म्हणून जाहीर सुनावणीचे नाटक करण्यात आले मात्र प्रत्यक्षात ग्राहकांच्या आक्रोशाचा व दरवाढीस केलेल्या विरोधाचा कसलाच विचार न करता आयोगाने महावीतरणसमोर शरणागती पत्कारत वीज दरवाढीचा आदेश पुन्हा लागु करीत वीज ग्राहकांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार केला आहे.

आयोगाने जाहीर सुनावण्याचे नाटक बंद करावे व महावितरण सांगेल तसे धोरण स्विकारुन किमान ग्राहक संघटनांचा वेळ ,श्रम व पैसा वाया घालवु नये, अशी प्रतिक्रिया विविध वीज ग्राहक संघटनांनी दिली आहे.

## राज्यस्तरीय शालेय फिल्ड आर्चरी स्पर्धेमध्ये

## आदर्श सी.बी.एस.ई च्या कु.ईश्वरी तळेकरचे यश

**विटा / प्रतिनिधी:–**

लातूर येथे पार पडलेल्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर आणि फिल्ड आर्चरी असोसिएशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय फिल्ड आर्चरी स्पर्धा २०२५ मध्ये दि.२९ मार्च २०२६ रोजी राज्यस्तरीय फिल्ड आर्चरी स्पर्धेमध्ये लोकनेते हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचलित आदर्श पब्लिक स्कूल सीबीएसईची इयत्ता अकरावीची विद्यार्थिनी कु. ईश्वरी सुहास तळेकर हिने इंडियन राऊंड मुली या गटात एक गोल्ड, ३ सिल्वर व १ ब्रांझ मेडल मिळवले. व तिची राष्ट्रीय फील्ड आर्चरी स्पर्धेसाठी निवड झाली असून सर्व स्तरातून तिचे कौतुक होत आहे.



या स्पर्धेत मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अँड. सदाशिवरावभाऊ पाटील, संस्थेचे अध्यक्ष अँड. वैभवदादा पाटील, कार्यकारी संचालक पी. टी. पाटील यांनी तिचे अभिनंदन करून ईश्वरीने मिळवलेल्या यशाचे कौतुक केले व पुढील स्पर्धेकरिता शुभाशीर्वाद दिलेत. या स्पर्धेकरिता प्रशालेचे प्राचार्य लतिफ मणेर, तिचे वडील प्राचार्य सुहास तळेकर, आई रजनी तळेकर, आर्चरीचे मार्गदर्शक, क्रीडा विभागाचे सर्व शिक्षक यांचे मार्गदर्शन मिळाले.

## अंनिस मार्फत शिंगणवाडीत दुसऱ्यांदा जटा निर्मुलन

### ईंदूबाई यादव तब्बल ४१ वर्षांनी जटामुक्त

**चरेगाव/प्रतिनिधी: –**

अंधश्रद्धा निर्मुलन समितीमार्फत चाफळ, ता. पाटण नजिक शिंगणवाडी येथे दुसऱ्यांदा जटा निर्मुलन करण्यात आले. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जिल्हा कार्याध्यक्ष सौ. वंदना माने, सातारा शहराध्यक्ष डॉ. दिपक माने, समितीचे सदस्य डॉ. अनिल घाडगे यांनी हा उपक्रम यशस्वी केला. तब्बल ४१ वर्षांनी जटांचे ओझे हलकं झाल्याचे ईंदूबाई विलासराव यादव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

पशुवैद्यकीय दवाखाना चाफळचे तत्कालीन डॉ. अनिल घाडगे हे उपचारासाठी शिंगणवाडी येथे जात होते. तेव्हा ईंदूबाई यादव यांचा मुलगा हणमंत यादव यांच्याशी जटा निर्मुलनाबाबत चर्चा झाली होती. यापूर्वी शिंगणवाडीतच सोनाबाई पवार



यांचेही जटा निर्मुलन करण्यात आल्याचे सांगितले. असणाऱ्या जटांचे ओझे वयोमानानुसार त्रासदायक ठरत असल्याचे ईंदूबाईना जाणवत होते. दरम्यान, अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सौ. वंदना माने व डॉ. दिपक माने, तसेच डॉ. अनिल घाडगे यांनी संपर्क साधून इंदुबाईंचे जटांबाबत शंकानिरसन केले. जटांचे असणारे ओझे व त्यामुळे केसांच्या मुळापासून ते मानेवर पडणारा ताण, परिणामी मणक्यांचा वाढलेला त्रास याबाबत सविस्तर चर्चा झाली. हणमंत यादव यांनीही कुटुंबियांची मनधरणी केल्यानंतर जटा काढण्याचे ठरले. त्यानुसार ईंदूबाईंना असणाऱ्या जटांच्या जोखडातून मुक्त करण्यात आले.

तब्बल ४१ वर्षे हे अज्ञानाचे ओझे ईंदूबाईंच्या मानेवर होते. त्यातून सुटका झाल्याचे ईंदूबाई यादव व कुटुंबाने अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे आभार मानले. इतक्या दिसाचं वझं कमी झाल्यानं मान, डोकं आता हलकं वाटतंय. जटा काढल्याव मला लई बरं वाटलं, अशी प्रतिक्रिया इंदूबाई यादव यांनी दिली.

## इंदुबाई गायकवाड यांचे निधन

**तांबवे/प्रतिनिधी:–**

सुपने येथील इंदुबाई आत्माराम गायकवाड (वय ७०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सामाजीक कार्यकर्ते दीपक गायकवाड यांच्या त्या आई होत. रक्षाविसर्जन विधी उद्या (मंगळवारी) सकाळी नऊ वाजता पश्चिम सुपने येथील स्मशानभुमीत होईल.



## एस.पी.तुषार दोशी ...

पान १ वरुन

या एकूणच घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सोमवारी सकाळी तुषार दोशी हे अचानक रजेवर गेल्याने शक्तीच्या रजेची चर्चा सुरू झाली .वरिष्ठ पातळीवरून म्हणजेच पोलीस महासंचालकांकडून याबाबत त्यांना अर्जित रजेच्या आड पडद्याने या प्रकरणाची राजकीय हवा जाईपर्यंत सुट्टीवर पाठवण्यात आल्याची चर्चा आहे .पुणे येथील वैद्यकीय चाचणी सत्र पार पाडल्यानंतर तुषार दोशी पुन्हा कामावर हजर झाले त्याचबरोबर त्यांनी पालकमंत्र्यांसमवेत काही बैठकांना उपस्थिती सुद्धा लावली होती .मात्र अचानक झालेल्या रजा प्रकरणाचा संबंध सातारा जिल्हा परिषदेमध्ये झालेल्या राजकीय राड्याशी जोडला जात आहे .मात्र सातारा पोलिसांच्या अधिकृत सूत्रांनी या चर्चांचे खंडन केले असून याबाबतचे परिपत्रक जाहीर केले आहे .या परिपत्रकानुसार दिनांक ६ एप्रिल पर्यंत पोलिस अधीक्षक तुषार दोशी हे ६ एप्रिल पर्यंत अर्जित रजेवर असून तोपर्यंत सातारा जिल्हा पोलीस दलाचा कार्यभार अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉक्टर वैशाली कडूकर या सांभाळणार आहेत .


दै.प्रीतिसंगम दि. ३१.०३.२०२६

**NAME CHANGS**

1) MY OLD NAME WAS NASHIR AAYUB MUJAWAR AND MY NEW NAME IS NASIR AAYUB MUJAWAR

2) MY OLD NAME WAS SHAHJAD MUBARAKALI SHAIKH. AND MY NEW NAME IS MOHAMMADSHAHEZAD MUBARAKALI. SHAIKH


### उपविभागीय दंडाधिकारी कराड उपविभाग कराड यांचे न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ थे दुरुस्ती विधेयक २०२३ अन्वये नोटीस

क्र.जन्म मृत्यू नोंद / एसआर–१२६/२०२५

श्रीमती नंदा एकनाथ इंगळे
रा. वराडे
ता. कराड जि. सातारा — अर्जदार

विरुध्द

सरकार तर्फ
ग्रामविकास अधिकारी, तथा जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी
ग्रामपंचायत वराडे ता. कराड जि. सातारा — जाबदार

ज्याअर्थी अर्जदार नंदा एकनाथ इंगळे रा. वराडे ता. कराड जि. सातारा यांनी अर्जामध्ये नमूद केलेली त्यांची सासु अंजिराबाई बचाराम इंगळे यांचा मृत्यु दिनांक १७/०४/२०१२ रोजी मोजे वराडे ता. कराड जि. सातारा येथे झाला असून मृत्यूची नोंद वरील कायदयाप्रमाणे ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत वराडे ता. कराड जि सातारा येथील जन्म मृत्यू रजिस्टरला व्हावी व त्याकामी मे. कोर्टाने योग्य ते आदेश पारीत करावे म्हणून अर्जदार यांनी मे. कोर्टात तसा अर्ज दिला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने सर्वांना कळविणेत येते की, अर्जदार नंदा एकनाथ इंगळे रा. वराडे ता. कराड जि. सातारा यांची सासु अंजिराबाई बचाराम इंगळे यांचा मृत्यू दि. १७/०४/२०१२ रोजीचे मृत्यूची नोंद वरील कायदयाप्रमाणे ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत वराडे ता. कराड जि. सातारा येथे होणेस कोणाची काही एक हरकत अगर तक्रार असलेस संबधितानी या मे. न्यायालयात दि. १५/०४/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय कराड येथे हजर राहुन आपले म्हणणे मांडावे अन्यथा कोणाचीही काहीएक तक्रार नाही असे समजून पुढील योग्य ते हुकूम होतील यांची नोद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दिनांक २५/०३/२०२६ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले असे.

स्थळ: कराड
तारीख: २५/०३/२०२६

सही/–
(अतुल म्हेत्रे)
उपविभागीय दंडाधिकारी
कराड उपविभाग,कराड




## माचुतर केंद्राचा बाल आनंद मेळावा संपन्न

**महाबळेश्वर/प्रतिनिधी : –**

शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी जिल्हा परिषद शाळा टेकवली, ता. महाबळेश्वर येथे माचुतर केंद्राचा सन २०२६ चा बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

मेळाव्याची सर्व तयारी शाळा व्यवस्थापन समिती टेकवली, ग्रामस्थ मंडळ टेकवली यांच्यावतीने सुंदर असे नियोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापिका सरस्वती ढेबे मॅडम, तसेच उपशिक्षक राहुल किरडे यांनी या नियोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

केंद्राचे केंद्रप्रमुख आदरणीय विनायक पवार, तसेच केंद्र संचालक अंकुश केळगणे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रातील नावली, शिंदोळा, माचुतर उर्दू, माचुतर मराठी, भालगी, टेकवली, एरंडल, मोळेश्वर आढाळ व धारदेव या शाळातील सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी या बाल आनंद मेळाव्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या फनी गेम्स संपन्न झाल्या. तसेच सर्व शाळातील विद्यार्थ्यांनी व्यासपीठावर सुंदर नृत्याविष्कार, सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. ज्ञानेश्वर गायकवाड व संतोष ढेबे यांनी या कार्यक्रमाचे प्रभावी सुत्रसंचलन केले.

दुपारी विद्यार्थ्यांना व सर्व शिक्षकांना टेकवली ग्रामस्थ यांच्यावतीने भोजनाची व्यवस्था करण्यात आली. शिंदे फाउंडेशन माचुतर यांच्या सौजन्याने विद्यार्थ्यांना मिष्ठान्न व सर्व शाळांना सन्मानचिन्ह देण्यात आले. गटशिक्षणाधिकारी श्री. गंबरे, केंद्रप्रमुख श्री. जंगम, केंद्रप्रमुख विनायक पवार यांच्या उपस्थितीत यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह वितरित करण्यात आले. जयराज जाधव यांनी आभार मानले. याप्रसंगी केंद्रातील सर्व विद्यार्थ्यांसह शिक्षक बंधू–भगिनी उपस्थित होत्या.


**सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.**

### नशिबाची परीक्षा

मंगळवार ३१ मार्च २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त — सिंगल ४-१-२ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| 130<br>248<br>220 | 4-7 | 124<br>467<br>700 | जोड<br>40-67-91-82-75 |

**कल्याणम**

उदय-अस्त — सिंगल ०-३-७ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| 127<br>280<br>460 | 0-4 | 158<br>680<br>455 | जोड<br>06-24-39-57-48 |

**मुंबैम ( मेन )**

उदय-अस्त — सिंगल ७-१-४ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| 179<br>278<br>377 | 7-0 | 145<br>235<br>550 | जोड<br>72-30-18-45-09 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

### आज का अंदाज

मंगळवार दिनांक ३१ मार्च २०२६

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| २ - ५ - ६ - ९ | ३ - ४ - ५ - ८ |
| १३८-४५६-१७८-१२६ | १५७-३३८-७६०-४४० |
| ३४५-३३९-३५८-२८९ | ४९०-४४६-३६६-५६७ |
| २००-१२२-४७८-४७८ | २२९-७८९-२४९-३६९ |
| जोडी | जोडी |
| १० -४० - ५९ - ८९ | ४५ -७५ - ८१ - ९१ |
| १२ -४२ - ५७ - ८७ | ४१ -७१ - ८९ - ९८ |
| १३ -४३ - ५६ - ८६ | ४२ -७२ - ८० - ९० |

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. ३१ मार्च
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

मंगळवार दिनांक ३१ मार्च २०२६

सर्व बाजार साठी

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | ४० | ७५ | ८५ |
| ३६ | ४६ | ७१ | ८१ |
| ३८ | ४८ | ७९ | ८९ |
| १४८ | ५९० | ८९० | १७० |
| ३४६ | ६८० | २५० | २६० |
| ४९० | १६० | १६० | ३५० |

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# शिखर शिंगणापूर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमले

## मुंगी घाटात रंगला चित्तथरारक कावड सोहळा:भक्ती आणि शक्तीचा अभूतपूर्व संगम

**वडूज/ दत्ता इनामदार:–**

हर हर महादेव... आणि म्हाद्या धाव... च्या गगनभेदी गर्जना... गुलालाची उधळण... ढोल–ताशांचा कडकडाट आणि लाखो शिवभक्तांचा अलोट उत्साह! अशा अत्यंत भक्तीमय आणि चैतन्यमय वातावरणात शिखर शिंगणापूर (ता. माण) येथील श्री शंभू महादेवाची यात्रा उत्साहात पार पडली. यंदा यात्रेला भाविकांनी हजेरी लावल्याने गर्दीचे सर्व विक्रम मोडीत निघाले असून, प्रचंड जनसमुदायामुळे संपूर्ण परिसरातील यंत्रणा अक्षरशः कोलमडून पडली होती.

**मुंगी घाटातील 'तो' थरार...**

यात्रेचे मुख्य आकर्षण असलेला मुंगी घाटातील चित्तथरारक कावड सोहळा शनिवारी पार पडला. सासवड येथील संत भुतोजीबुवा तेली यांची मानाची कावड मुंगीघाटातून वर चढल्यानंतर शंभू महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक करण्यात आला. शिवभक्तांनी मानवी हातांची साखळी करून ज्या पद्धतीने कावडी डोंगरमाथ्यावर चढवल्या, तो सोहळा पाहून उपस्थित भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

**यात्रेतील प्रमुख विधी आणि परंपरा**

हळदी सोहळा: चैत्र शुद्ध पंचमीला शिव–पार्वती हळदी समारंभाने यात्रेचा श्रीगणेशा झाला.विवाह सोहळा: अष्टमीला लाखो वऱ्हाड्यांच्या उपस्थितीत शिव–पार्वती विवाह पार पडला.मानाचे जलाभिषेक: भातांगळीची मानाची काठी, शेवगावच्या इंदौर घराण्याचा जलाभिषेक आणि काळगावडे राणे यांचे अश्वारूढ दर्शन हे आकर्षणाचे केंद्र ठरले.कावड मिरवणूक: द्वादशीला 'देवाच्या लग्नाची वरात' म्हणून हजारो कावडींनी पुष्कर तलावातील तीर्थ घेऊन मंदिराकडे कूच केली.

शिंगणापूरकडे येणारे सर्व रस्ते ओसंडून वाहत होते. वाहनांच्या लांबच लांब रांगांमुळे वाहतुकीचा पूर्णपणे बोजवारा उडाला होता. सोलापूर जिल्हा प्रशासनाने कोथळे येथे मानाच्या कावडींचे स्वागत केले, तर सासवड, पुरंदर आणि बारामती भागातील हजारो शिवभक्तांनी 'शक्ती–भक्ती'चा अनोखा संगम मुंगी घाटात घडवून आणला.शंभू महादेवाच्या ओढीने आलेल्या लाखो भाविकांच्या गर्दीने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे केले होते, मात्र


शिखर शिंगणापूर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमले

भक्तांच्या उत्साहापुढे सर्व अडचणी फिक्या पडल्या.

# सातारा– पंढरपूर महामार्गावरील अर्धवट कामे तातडीने पूर्ण करा

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा ते लातूर व सातारा ते पंढरपूर महामार्गाचे काही ठिकाणी अर्धवट काम राहिले आहे. यामुळे अपघात होऊन नागरिक जखमी होत आहेत. ही गंभीर बाबा असून रस्ते विकास महामंडळाने अर्धवट कामे प्राधान्याने पूर्ण करावेत, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सातारा ते लातूर व सातारा ते पंढरपूर महामार्गाविषयी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीपाद जाधव



यांच्यासह रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

मौजे धुळदेव ता. माण येथील अर्धवट रस्त्याच्या कामामुळे मोठ्या प्रमाणत या ठिकाणी अपघात होत आहेत. हा रस्ता तातडीने पूर्ण करावा, अशा सूचना करुन ग्रामविकास मंत्री श्री. गोरे म्हणाले, दिवड हद्दीत पुलाचे काम अर्धवट असून काम पूर्ण होईपर्यंत येथील रस्त्यावर डांबरीकरण करावे. मौजे पळशी येथील ५० मिटर रस्ता अर्धवट असून या ठिकाणी डांबरीकरण करावे.

मौजे गोंदवले ब्रु. येथील ब्रम्हचैतन्य मंदिर ते शेतकरी भवन या ठिकाणी नियमापेक्षा उंच गतीरोधक केले आहेत ते काढून शासकीय निकषा प्रमाणे गतीरोधक तयार करावा. चिमणगाव ता. कोरेगाव येथील ३० मीटर रस्ता अपूर्ण आहे तो तातडीने पूर्ण करावा. तसेच सोलापूर जिल्ह्यातील मौजे पिलीव ते पंढरपूर या रस्त्याच्या अर्धवट कामाच्या ठिकाणी डांबरीकरण करावे, असे निर्देशही ग्रामविकास मंत्री श्री. गोरे यांनी दिले.

# सत्ता परिवर्तनाची चळवळ तळागाळात राबवली पाहिजे

## ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांचा साताऱ्यात पवित्रा

**सातारा/प्रतिनिधी:–**

२०१९ च्या आगामी निवडणुकांमध्ये इतर मागास प्रवर्गाच्या मतदारांनी सत्तेतला आपला हिस्सा आता हिसकावून घ्यायला हवा सत्ता परिवर्तनाची चळवळ ही आता व्यापक पद्धतीने तळागाळातून राबवणे गरजेचे आहे त्यासाठी सर्वांनी एकजुटीने कामाला लागावे असे कळकळीचे आवाहन ओबीसी समाजाचे नेते प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी केले .



साताऱ्यात ओबीसी जिल्हा संघटनेच्या वतीने ओबीसी बहुजन संविधान बचाव अभियान येथील शाहू चौकातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात आयोजित केले होते त्यावेळी लक्ष्मण हाके बोलत होते . यावेळी ड मंगेश ससाणे, नवनाथ वाघमारे, चंद्रकांत खंडाईत, भरत लोकरे उपस्थित होते.

हाके पुढे म्हणाले, ''ओबीसी समाज आजही हक्कांसाठी झोळी घेऊन उभा आहे, ही शोकांतिका आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार ओबीसींपर्यंत पोहोचले नाहीत, त्यामुळे अन्याय सहन करण्याची वेळ आली आहे. राजसत्ता ही मागून मिळत नाही, ती हिसकावून घेण्याची हिंमत मनगटात असावी लागते. आजपर्यंत निर्णय प्रक्रियेत ओबीसींचा सहभाग नसल्याने अध्यक्षपद, वसतीगृह यांसारख्या सुविधा मिळत नाहीत.

ओबीसी चळवळ अधिक व्यापक करण्याची गरज असून वास्तवतेची धुरा कुणीतरी स्वीकारली पाहिजे. त्यामुळे २०२९ पर्यंत ही चळवळ दिल्लीपर्यंत पोहोचवून सत्तेचा बदल घडवून आणू. ओबीसीतील भटक्या–विमुक्त समाज आजही मूलभूत गरजांपासून वंचित आहे. त्यांच्याकडे जमीन नाही, शिक्षणाची सोय नाही, मग आपण नेमक्या कोणत्या भारतात जगतो आहोत, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

फुले–शाहू–आंबेडकरांचा विचारांचा महाराष्ट्र आता दिसत नाही, तर तो काही मोजक्या कारखानदारांच्या हातात गेला आहे, अशी टीकाही त्यांनी केली. मंडल आयोगाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुढे यावे लागेल. आम्ही संविधान आणि कायद्याची भाषा बोलत असल्यामुळेच आमच्यावर विरोध होत असल्याचेही त्यांनी सांगितले.''

# वाई व खंडाळा तालुक्यात वीज पडून २५ मेंढ्या ठार तर मेंढपाळ जखमी

**वाई/दौलतराव पिसाळ:–**

साताऱ्यातील वाई व खंडाळा परिसरात ढगांच्या गडगडाटात आणि विजांच्या कडकडाटात गारांसह गारांसह जोरदार अवकाळी पाऊस झाला.

सोमवारी दुपारी चार वाजता आसले (ता वाई) गावाचे हद्दीत पांडवनगर येथे शेतात चरणाऱ्या मेंढ्या चे कळपावर अचानक वीज पडल्याने सोळा मेंढ्या जागीच ठार झाल्या, तर मेंढपाळ नंदकुमार पांडुरंग पिसाळ (पांडवनगर, आसले) हे जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी वाई येथे खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे.

याबाबत घटनास्थळी मिळालेल्या व भुईंज पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सोमवारी दुपारी चार वाजता पाऊस सुरू होतानाच अचानक वीज कोसळली व यात आसले येथील मेंढ्याचा कळप सापडला.मेंढपाळ नंदकुमार पिसाळ हे यात सुदैवाने बचावले.पण डोळ्यासमोर १६ मेंढ्या



मृत पाहून ते पुरते हतबल झाले.

घटनास्थळी भुईंज पोलिसांच्या टीमने धाव घेत सहाय्यक फौंजदार शिवाजीराव तोडरमल यांनी पोलीस पाटील व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांचे उपस्थितीत पंचनामा करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते. पशुवैद्यकीयअधिकारी डॉ सिसोदिया, भुईंज पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पृथ्वीराज ताटे, सहाय्यक फोउजदार शिवाजीराव तोडरमल, चंद्रकांत भोसले, सुहास कांबळे, होमगार्ड सुशांत धुरगुडे यांनी घटनास्थळी भेट दिली.

खंडाळ्यासह पारगाव, अजनूज, कर्नवडी, कण्हेरी, लोहोम, जवळे, शिरवळ, भोळी, शिवाजीनगर, भादवडे, मोर्वे आदी ठिकाणी सोमवारी दुपारनंतर पावसाने हजेरी लावली. यावेळी भोळी परिसरात गारांचा पाऊस झाला. तर उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे. ठिकठिकाणी पिकांची काढणी सुरु असून अचानक झालेल्या पावसाने शेतकऱ्यांची तारांबळ उडाली.

खंडाळा तालुक्यातील मोर्वे येथील सोलाडी नावाच्या शिवारात अमोल धायगुडे आपल्या शेळ्या घेऊन गेले होते.सायंकाळी या परिसरात पावसाने सुरुवात केली. यावेळी धायगुडे यांच्या शेळ्यांच्या कळपावर वीज कोसळली.यात नऊ शेळ्या जागीच ठार झाल्याची घटना घडली. शेळ्या दगावल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.या घटनेमुळे धायगुडे यांचे सुमारे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.रात्री उशिरापर्यंत काही ठिकाणी पावसाच्या सरी बरसत असून या पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला आहे.

# कस्तुरबा रुग्णालयाच्या इमारतीवर पालिकेचा हातोडा

## अवैध व्यवसायाला प्रतिबंध करण्यासाठी केली कारवाई

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या आणि सातारकर यांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या कस्तुरबा रुग्णालयाच्या मोडकळीसआलेल्या इमारतीवर पालिकेने हातोडा टाकत त्या वास्तूची संरचना जमीनदोस्त केली .या परिसरात अवैध धंदे खोपवल्याचे स्पष्टीकरण नगराध्यक्षांनी देत त्या जागेचा योग्य वापर आगामी विकास कामांसाठी केला जाईल असे त्यांनी स्पष्ट केले आहे .अनेक दशकांपासून राजवाडा परिसरात उभे असलेल्या या या इमारतीचा ढाचा जमीनदोस्त करण्यात आल्याने कस्तुरबाच्या जुन्या आठवणी आता इतिहास जमा झाल्या आहेत

कस्तुरबा रुग्णालयाची ही इमारत एकेकाळी सातारकरांच्या आरोग्याचे मंदिर होती. मात्र, प्रशासकीय दुर्लक्ष आणि देखभालीअभावी या देखण्या वास्तूची रया गेली होती. रुग्णालयाचे कामकाज नवीन इमारतीत हलवल्यानंतर, या जुन्या वास्तूचा ताबा मद्यपी आणि जुगारींनी घेतला होता. खिडक्यांचे गज, दरवाजे आणि छताची पडझड झाल्याने ही जागा भयावह बनली होती. इतकेच नव्हे तर, या ओसाड इमारतीत आत्महत्येसारख्या घटनाही घडल्याने परिसरात दहशत पसरली होती .प्रसार माध्यमांनी या इमारतीच्या दुरावस्थेबाबत आणि येथे जाणाऱ्या अवैध धंद्याबाबत वेळोवेळी आवाज उठवला होता

नगराध्यक्ष अमोल मोहिते यांनी तक्रारींची दखल घेत नुकतीच या जागेची पाहणी केली होती. परिस्थितीची दाहकता आणि नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेता, त्यांनी ही इमारत तत्काळ पाडण्याचे आदेश दिले. मजूर संस्थेची तांत्रिक परवानगी मिळताच सोमवारी सकाळी पालिकेचे पथक या ठिकाणी धडकले आणि काही तासांतच अवैध व्यवसायांचे हे केंद्र भुईसपाट करण्यात आले. कस्तुरबा रुग्णालयाची जुनी इमारत केवळ मोडकळीस आली नव्हती, तर ती गुन्हेगारी कारवायांचे केंद्र झाली होती. दिवसाढवळ्या तेथून जाणे महिला आणि नागरिकांना जिकीरीचे बनले होते. पालिकेच्या मालकीच्या जागांचा गैरवापर खपवून घेतला जाणार नाही. अशा प्रकारे कुठेही अवैध धंदे सुरू असल्याचे आढळल्यास कोणाचाही मुलाहिजा न ठेवता कठोर कारवाई केली जाईल.

# कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी एम आय डि सी शिराळा येथे त्वरित जागा उपलब्ध करुन देणार

**शिराळा/प्रतिनिधी : –**

शहरातील भाजप नगरसेवक यांनी आमदार सत्यजित देशमुख यांच्या उपस्थितीत उद्योग मंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन शिराळा शहरातील घनकचऱ्याबाबत जागेच्या अडचणीबाबत चर्चा केली. यावेळी घनकचरा व्यवस्थापनसाठी कचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू करण्यासाठी औद्योगिक वसाहतीत त्वरित आदेश देण्यात येतील व जागा वर्ग करण्यात येईल, असे सांगितले.



मुंबई येथे विधानभवनात शिराळा शहर भाजप नगरसेवकांच्या वतीने शिराळा शहराचा घनकचरा प्रकल्पसाठी एमआयडीसी शहरात जागा उपलब्ध करुन देण्यासाठी निवेदन दिले.

शिराळा शहराला आरोग्यदायी मुलभूत सेवा सुविधा देण्याकामी नगरपंचायत स्थापनेचा शासन निर्णयानुसार घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध होणे गरजेचे आहे. शिराळा शहराची लोकसंख्या अंदाजे ३०००० इतकी आहे. सरासरी दररोज ४ टन कचरा संकलित होत आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणी करणेकरिता शासना मार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल व निधी मंजुर करण्यात आलेला आहे. परंतु, घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी १ हेक्टर जागा गरजेची आहे. तरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ शिराळा हद्दीतील जागा उपलब्ध करुन देण्यात यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार सदाभाऊ खोत, आमदार सत्यजित देशमुख, उपनगराध्यक्ष बसवेश्वर शेटे, नगरसेवक केदार नलवडे, रमेश कांबळे, अभिजीत यादव, सचिन डांगे, विघाधर कुलकर्णी, महेश पाटील, रामचंद्र जाधव, कुलदीप निकम, ओकांर पाटील उपस्थित होते.

# शिराळा नगरपंचायत, स्मारक व शहीद भवन बांधण्यासाठी जागेचा प्रश्न मार्गी

## आ.सत्यजित देशमुख

**शिराळा/प्रतिनिधी : –**

शिराळा येथे नगरपंचायत कार्यालय बांधण्यासाठी १९ गुंठे, माजी सैनिक भवन बांधण्यासाठी १० गुंठे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी ७.५० गुंठे जागा महाराष्ट्र शासनाच्या महसुल विभागाकडून शिराळा नगरपंचायतीच्या नावाने वर्ग करण्यास सांगली जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी मान्यता दिली आहे, अशी माहिती आमदार सत्यजीत देशमुख यांनी दिली.

आमदार देशमुख म्हणाले, सध्य स्थितीत शिराळा नगरपंचायतीचे काम अपुऱ्या जागेमध्ये सुरू आहे. विविध विभागांना,



कर्मचारी वर्गाला कामकाजासाठी जागा अपुरी पडत होती. त्यामुळे नवीन इमारत बांधणे गरजेचे आहे. यादृष्टीने जागा उपलब्ध करून दिल्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला आहे. अंबामाता मंदिराशेजारील मोकळ्या जागेत नुतन कार्यालयाचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच आंबेडकर प्रेमींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक व्हावे, अशी मागणी अनेक वर्षे केली होती. नाथ फाटा येथील जागेत ते होणार आहे.

माजी सैनिक संघटनेने सुद्धा त्यांचा शहीद व सैनिक भवन बांधण्यासाठी मागणी केली होती. अंबामाता मंदिराशेजारील मोकळ्या जागेत ते बांधण्यात येणार आहे. वरील निर्णयामुळे अनेक वर्षे प्रलंबित प्रश्न मार्गी लागला आहे. अटीची पुर्तता करुन लवकरच पुढील कार्यवाही होणार आहे. शिराळा शहराला आधुनिक शहर बनविण्यासाठी महायुती सरकार कटिबद्ध आहे, असे आमदार सत्यजित देशमुख यांनी सांगितले.

हे प्रश्न मार्गी लागण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार धैर्यशील माने, भाजप जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, जिल्हाधिकारी अशोक काकडे, प्रांताधिकारी श्रीनिवास अर्जुन, तहसीलदार श्यामला खोत–पाटील, नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक, उपनगराध्यक्ष बसवेश्वर शेटे व नगरसेवक, मुख्याधिकारी सुरज कांबळे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

# विटा वाहतूक पोलिसांचा मार्च एंडिंगमुळे कारवाईचा बडगा

## चारचाकी व दुचाकी चालकांवर दंडात्मक कारवाई

**विटा / प्रतिनिधी:–**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा शहरात विटा उपविभागीय पोलीस अधिकारी विपूल पाटील यांच्या आदेशानुसार विट्यात रस्त्यावर वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वाहनधारकावर तसेच मोटरसायकल वरून ट्रिपल सीट, बिगर लायसन्स, बिगर कागदपत्रे, अल्पवयीन मोटरसायकल चालक या वाहनधारकांनवर विटा वाहतूक नियंत्रण शाखेच्या वतीने वाहतूक पोलिसांच्या वतीने मार्च एंडिंग व सतत वाहतुकीच्या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वरती कायदेशीर ऑनलाईन दंड करताना वाहतूक पोलीस रस्त्यावर दिसून येत आहेत. या कारवाईमुळे वाहनधारकांची मात्र चांगलीच तारांबळ उडाली आहे.

विट्यातील प्रत्येक मुख्य रस्त्यावर पोलीस दुचाकी आणि



चारचाकी धारकावर कारवाई करताना दिसत असल्यामुळे अन्य वानधारक गल्लीबोळातून धूम ठोकत आहेत. आता गल्लीबोळातसुद्धा पोलीस कारवाई करताना दिसत आहेत. विटा पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे यांनी रस्त्यावर वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वाहनधारकावर कारवाई करण्याचे आदेश वाहतूक नियंत्रण शाखा या शाखेचे वाहतूक पोलीस यांना सूचना दिल्या आहेत. वाहतूक नियंत्रण शाखेत चे पोलीस उपनिरीक्षक सचिन माळी यांची बदली झाल्यानंतर अजूनही विटा वाहतूक नियंत्रण शाखेला संबंधित पोलीस उपनिरीक्षक नसल्याने सध्या विटा उपविभागीय पोलीस अधिकारी विपूल पाटील यांच्या आदेशानुसार विटा वाहतूक नियंत्रण शाखेचे कारवाईचे काम वाहतूक पोलीस करताना दिसत आहेत.

मार्च एंडिंग असल्यामुळे विटा वाहतूक नियंत्रण शाखेने रस्त्यावर उतरून कारवाईला सुरुवात केली आहे. मोबाईलवर गाडी चालवताना बोलणे, अल्पवयीन चालक गाडी चालवताना सापडला, ट्रिपल सीट मोटरसायकलवर सापडला, चारचाकी वाहनातून मोबाईलवर बोलताना चालक सापडला तसेच सुसाट वेगाने येणाऱ्या वाहनधारकावर त्याचबरोबर बिगर नंबर प्लेट, फॅन्सी नंबर प्लेट अशा वाहन धारकावर विटा वाहतूक नियंत्रण शाखेचे वाहतूक पोलीस कारवाई करत आहेत.


## भावपूर्ण श्रद्धांजली



स्व.जयवंतराव जाधव

आमच्या संस्थेचे माजी व्हा.चेअरमन,कराड नगरीचे माजी नगराध्यक्ष
स्व.जयवंतराव जाधव यांच्या २५ व्या पुण्यस्मरणानिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली

श्री.राजन वसंतराव वेळापुरे – चेअरमन
श्री.अनिल नामदेव सोनवणे – व्हा.चेअरमन

**संचालक मंडळ**

श्री.मुनीर गुलाब बागवान सावकार (श्री.कालिका कुटुंब प्रमुख)
श्री.प्रा.अशोककुमार रघुनाथ चव्हाण
श्री.सुरेश तेजराज भंडारी
श्रीमती जयाराणी जयवंतराव जाधव
श्री.पारस चंद्रकांत विजापुरे
श्री.अरूण सोपानराव जाधव
श्री.शरदचंद्र विष्णु देसाई
श्री.निरंजन गजानन मोहिरे
सौ.सिमा विनायक विभुते
श्री.संतोष लक्ष्मणराव मोहिरे
श्री.राजेंद्रकुमार बापुराव यादव
डॉ.जयवंत नारायण सातपुते
श्री.सुरेश वासुदेव कोळेकर

श्री विवेक पद्मराज वेळापुरे (कार्यलक्षी संचालक) व सेवक वर्ग

**श्री.कालिकादेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,कराड**
६/१,गुरूवार पेठ,कासार गल्ली,कराड

**श्री.गणेश मंडळ,** कासार गल्ली,मेनरोड,कराड


### माची पेठेत १९ वर्षीय तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

**सातारा/प्रतिनिधी:–**

माची पेठेत वास्तू अपार्टमेंट मध्ये राहणाऱ्या १९ वर्षीय तरुणीने राहत्या घरी बेडरूम मधील सिलिंग फॅनला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि २९ रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी आईने सातारा शहर पोलीस ठाण्यात खबर दिली आहे.


## सातारा जिल्हा परिषद सातारा
## बांधकाम विभाग दक्षिण ई निविदा नोटीस क्र. ९२

बांधकाम विभाग दक्षिण जिल्हा परिषद सातारा यांचे कार्यालयाकडून सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षामधील २५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम १०९, पंचायत राज ३१ सहायक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहायक अनुदाने २५१५–००५३ या लेखाशिर्षकामधील कामांची ई निविदा नोटीस क्रं. ९२ दि. ३१.०३.२०२६ ते दि ०७.०४.२०२६ अखेर ८ दिवस शासनाच्या संकेतस्थळ http:// mahatenders.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा प्रसिध्द करणेत आली आहे. ई निविदा ऑनलाईन सादर करण्याच्या असून सादर करण्याची अंतिम मुदत दि ०७.०४.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत राहील. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

सही/–
कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग दक्षिण जि.प. सातारा

सही/–
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद सातारा

जा.क्र./बांधकाम/द/लेखा–७/९२/२०२६
बांधकाम विभाग दक्षिण
सातारा जिल्हा परिषद सातारा
दि. ३०.०३.२०२६


# कराडमध्ये कृष्णामाई यात्रेस तीन एप्रिलपासून प्रारंभ

## उत्सवकाळात भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन ; सोमवार ६ रोजी यात्रेचा मुख्य दिवस

**कराड/प्रतिनिधी : –**

कराड नगरीचे ग्रामदैवत श्री कृष्णामाई यात्रा महोत्सवाची तयारी जोरात सुरू झाली असून, ३ ते ६ एप्रिलदरम्यान कृष्णा घाट परिसरात हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. यात्रा उत्सव समितीतर्फे धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनपर कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

उत्सवाची सुरुवात रामनवमी निमित्त गुरुवार (दि. २६) मार्च रोजी सायंकाळी कृष्णा घाटावर श्री. व सौ. मोहनराव शिंदे यांच्या हस्ते मखर पूजनाने होणार आहे. २ एप्रिलला हनुमान जयंतीच्या दिवशी सायंकाळी सात वाजता सोमवार पेठ येथून आवटे–पुजारी यांच्या घरापासून श्रींची पालखी सवाद्य मिरवणुकीने निघून रात्री दहा वाजता मंडपात श्रींची विधिपूर्वक प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.

शुक्रवार ३ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजता हळदी कुंकू व



श्री नवचंडी याग होणार आहे. सायंकाळी पाच वाजता स्वरांजली महिला मंडळाचा भजनाचा कार्यक्रम होणार असून सायंकाळी सहा वाजता राधा महिला मंडळाचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी सव्वा सात वाजता ब्रह्मनाथ संस्थेतर्फे गीत रामायण कार्यक्रम होणार आहे. शनिवार ४ रोजी सायंकाळी पाच वाजता समर्थ महिला मंडळाचे भजन, सायंकाळी सहा वाजता श्रीराम महिला मंडळाचे भजन होणार आहे. सायंकाळी सव्वा सात वाजता जुन्या हिंदी चित्रपटातील गाण्यांचा कार्यक्रम होणार आहे. रविवार ५ रोजी सायंकाळी पाच वाजता गजानन महिला मंडळाचे भजन, सायंकाळी सहा वाजता साई महिला मंडळाचे भजन, सायंकाळी सब्बा सात वाजता मन करा रे प्रसन्न हा डॉ. संजय उपाध्ये यांचा कार्यक्रम होणार आहे.

सोमवार (दि. ६) एप्रिल हा यात्रेचा मुख्य दिवस असणार आहे. या दिवशीही सायंकाळी भजनांचे कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर ७ एप्रिल रोजी सकाळी श्रींची पालखी नगर प्रदक्षिणेसाठी निघणार आहे. संध्याकाळी लळीत कीर्तन, वसंत पूजा आणि येसूबाई यात्रा यांसह महोत्सवाची सांगता होणार आहे.

उत्सव काळात दररोज सकाळी महापूजा, अभिषेक, आरती तसेच दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. जुने कृष्णामाई सांस्कृतिक केंद्र येथे दुपारी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.